

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक

जानेवारी-फेब्रुवारी १९९७

# श्री साईलीला

रुपये ८





# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | " | श्री. भास्कर श. बोरावके | " |
| श्रीमती रेखा ग. दिघे | " | श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील | " |
| श्री. प्रकाश व्र. कारखानीस | " | श्री. राजीव पुं. रोहोम | " |
| श्री. मुकेश र. पटेल | " | श्री. संभाजी कि. काळे | " |
| श्री. मधुकर द. जोशी | " | श्री. अशोक भि. खांबेकर | " |
| श्री. प्रकाश पी. वैशंपायन | " | सौ. प्रेमाबाई सो. बज | " |
| श्री. मधुकर ज. गर्दे पाटील | " | श्री. रामचंद्र नि. गोसावी | " |
| श्री. देवकीनंदन सारस्वत | " | श्री. प्रभाकर तु. बोरावके | " |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | " | श्री. सोपान मा. धोर्डे | " |

कार्यकारी अधिकारी : **श्री. स. स. पेंडसे**

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक १०-११

जानेवारी-फेब्रुवारी १९९७

: संपादक :
**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :
**विद्याधर ताठे**

**: कार्यालय :**

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**


वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

## नववर्षाच्या सहर्ष शुभेच्छा

**हे नववर्ष साईभक्त, वाचकांना आनंदाचे व सुखसमृद्धीचे जावो !**



## अंतरंग
### संत गौरव अंक

- **संपादकीय :** विद्याधर ताठे — २
- **सत्संग :** शाम जुवळे — ४
- **श्री साईसच्चरित पारायणाचे अनुभव :** माधवराव भागवत — ५
- **सकल संत कार्यगौरव :** ह. ल. रानडे — ८
- **स्वरुप साधना :** कृष्णा तेली — १४
- **योगीयांचा राजा ज्ञानोबा माझा :** गजानन कुलकर्णी — २१
- **साईप्रचिती :** सौ. नीता जाधव — ३१
- **साईदर्शन :** धर्माजी पाटील — ३५
- **श्री साईबाबांचे कार्य :** प. धो. गुळूमकर — ३७
- **शिरडीवृत्त :** ज्ञानेश्वरी पारायण सोहळा — ३८
- **साईवंदना** — ३९
- **कांची पीठाचे श्रीचंद्रशेखरेंद्रस्वामी :** म. पां. वाळिंबे — ४२
- **अभिप्राय** — ४९
- **साईभक्तांना आवाहन** — ५०
- **संस्थानतर्फे प्रकाशित ग्रंथांची सूची** — ५१

# संपादकीय

विद्याधर ताठे



**जय जय जी साईनाथा । पतितपावना कृपावंता ।**
**तुझ्या पदी ठेवितो माथा । आता अभय असूं दे ।**

१९९७ मधील हा पहिला अंक संक्रांतीच्या पर्वकाळात आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. सर्व साईभक्त वाचकबांधवांना नववर्षाच्या **सहर्ष शुभेच्छा !**

खरं तर आपलं भारतीय नववर्ष चैत्र प्रतिपदा म्हणजे गुढी पाडव्यापासून सुरु होते. नववर्षाच्या - नव सवंत्सराच्या शुभेच्छा खरं तर आपण भारतवासीयांनी त्या काळातच परस्परांना दिल्या पाहिजेत. पण आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांनी एकसुत्रीपणा व समन्वय साधण्याच्या दृष्टीने १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हे वर्ष मान्य केलेले असून भारत त्या राष्ट्रांपैकी एक आहे. संगणकीय प्रसारमाध्यमांनी व उपग्रह दळणवळणामुळे आज सर्व राष्ट्रे इतक्या जवळ जवळ आलेली आहेत की भाषेच्या-सीमेच्या भेद रेषा धुसर झालेल्या आहेत. विश्वबन्धुत्व-विश्वधर्म या नव्या उदात्त व व्यापक उद्दिष्टांकडे सर्वांची वाटचाल सुरु झालेली आहे. विश्वमानवधर्म व वैश्विक कुटुंबाच्या उदात्त कल्पना भारतीय विचारधारेला नव्या नाहीत. **'वसुधैव कुटुंबकम्'** या वेदकालिन कल्पनेत आपणास विश्वव्यापी उदात्ततेची बीजे आढळून येतात. आज विज्ञानाने उपग्रह दळणवळण व संगणकीय संदेशवाहक माध्यमांनी त्या एकेकाळच्या कल्पना शक्य कोटीत आणल्या आहेत. श्री साईबाबा हे विश्वमानवधर्माचे-विश्वबन्धुत्वाचे थोर पुरस्कर्ते होत. त्यांनी हिंदू-मुस्लिम-इसाई-पारशी-बौद्ध-जैन असा कोणत्याही एका धर्म-पंथातील कर्मकांडाचा प्रचार न करता सर्वधर्मसमभावी मानवधर्माचा पुरस्कार केला. कर्मकांडाला फाटा देऊन निखळ श्रद्धा-भक्ती व माणुसकीला त्यांनी आपल्या कार्याचे अधिष्ठान केले. यामुळेच आज साईबाबा सर्वधर्मिय अनुयायांचे **'श्रद्धास्थान'** म्हणून सर्वत्र नमिले-पूजिले जात आहेत. साईबाबांचा दरबार सर्वधर्मियांना आपला दरबार वाटत आहे. साईबाबांच्या दरबारात माथा टाकून पावन होण्यासाठी पंजाबातील शीख येतात, मुंबईतील पारशी येतात, लखनौचे मुसलमान येतात, गुजरातमधील जैन-मारवाडी येतात, दक्षिणेतून लिंगायत येतात, श्रीमंत येतात तसे गरीब येतात आणि सुखसमाधानाने तृप्त होऊन परत जातात. साई दरबार हा समतेचा दरबार आहे, साई दरबार हा आनंदाचा दरबार आहे. तृप्तीचा दरबार आहे. शांती समाधानाचा दरबार आहे. **'जो जे वांच्छिल तो ते लाहो'** असा इच्छापूर्तीचा दरबार आहे. श्रद्धेने-निष्ठेने जो येथे येतो तो मनाची झोळी शांती समृद्धीने भरून घेऊन जातो. बाबांच्या या वैशिष्ट्यामुळेच अनेक नव्हे तर असंख्य भक्त आपल्या नववर्षाचा श्रीगणेशा शिरडीभेटीने - बाबांच्या दर्शनाने करतात. २५ डिसेंबरनंतर भक्तांची शिरडीला अपार गर्दी होऊ लागते व ३०-३१ डिसेंबरला गर्दीचा उच्चांक होतो. या एका आठवड्यामध्ये श्री बाबांच्या गुप्तदानपेटीत ५५ लाख रुपये गोळा झाले. हा गुप्तदानाचा आकडा लक्षात घेता. बाबांच्या प्रेरणेने भक्तांमध्ये कशाप्रकारची त्यागाची-दानाची भावना निर्माण केलेली आहे हे व्यक्त होते. बाबा हयात असताना शिरडीत घरोघर भिक्षा मागायचे व भिक्षेत मिळालेले अन्न



सर्वांना वाटून टाकायचे. आपण भिक्षा का मागता ? असे त्यांना कोणीतरी विचारले, तेव्हा बाबांनी दिलेले उत्तर चिंतन करण्याजोगे आहे. तेव्हा बाबा म्हणाले होते, **'लोकांमध्ये दानाची-त्यागाची भावना वाढावी, त्यांना दानाची-त्यागाची सवय लागावी म्हणून मी भिक्षा मागतो.'** खरं तर बाबा सिद्धयोगी होते. क्षुधातृष्णांना त्यांच्या जीवनात स्थानच कुठे होते ? त्यांचे सारे करणे, न करणे समाजासाठी - भक्तांसाठी होते. म्हणूनच बाबांचा आपण **'भक्तवत्सल', 'दिनानाथ', 'दिनबन्धू'** आदी विशेषणांनी गुणगौरव करीत असतो.

'जानेवारी-फेब्रुवारी ९७'च्या या अंकात **साई सत्संग, बाबांचे कार्य, साईदर्शन** हे बाबांचे अगाध-अतर्क्य महात्म्य सांगणारे लेख आम्ही समाविष्ट केलेले आहेत. त्याचबरोबर हेमाडपंतलिखित 'श्री साईसच्चरित' पोथीच्या वाचनाचे-पारायणाचे भक्तांना आलेले अनुभव कथन करणारा एक लेख, या अंकातील वैशिष्टचपूर्ण लेख ठरावा. त्याशिवाय संत व त्यांचे जीवनकार्य समजून न घेता त्यांच्यावर नाहक टीका करणारांसाठी 'संत व उद्यमशीलता' हा लेख मुद्दाम आम्ही दिलेला आहे. संत म्हणजे निरुद्योगी-निवृत्तीमार्गी आदी आरोप कशाप्रकारे नाहक आहेत हे प्रस्तुत लेखाने स्पष्ट होईल असे वाटते. कर्जतचे प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक श्री. वसंत जोशी यांची, त्यांनी दिवाळी अंकासाठी पाठविलेली कविता आमच्या हाती खूप उशिरा आल्याने या अंकात समाविष्ट केलेली आहे. कवितेतील सामाजिक आशक व बोध मननीय आहे. या संदर्भात एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, काही दिवसांपूर्वी मी संस्थानच्या कामानिमित्त 'सकाळ'च्या बेलापूर येथील सकाळभवनात गेलो होतो. तेथे 'सकाळ'चे संपादक श्री. राधाकृष्ण नार्वेकर भेटले. त्यांच्याशी झालेल्या वार्तालापात, त्यांनी शिरडीची आठवण सांगताना, त्यांना बाबांच्या समाधी मंदिरात जाऊन बाबांच्या मूर्तीपुढे उभे राहिले असता बाबांच्या कपाळावर असंख्य झोपड्या व दीनवाणे झोपडपट्टीवासी दिसले असे सांगितले. त्यावर मी त्यांना म्हणालो - 'ाबाबांना पाहताच झोपड्या व दीनवाणे झोपडपट्टीवासियांचे भक्तांना दर्शन-स्मरण व्हावे, हे बाबांच्या दीनबन्धुत्वाची दीनानाथ असण्याचीच प्रचिती नव्हे काय ?' असो.

एप्रिल ९७ पासून श्री साईलीला अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे यानिमित्ताने सर्व साईभक्तांनी वर्गणीदार वाढविण्याचे प्रयत्न करुन श्री साईलीला मराठीतील अग्रगण्य नियतकालिक करायचे आहे. याबद्दल गेल्या अंकात आपणास आवाहन केले होते. त्याचे पुन्हा एकदा स्मरण करून या संपादकीयास पूर्णविराम देतो.

**जगाचे आद्य कारण । जे का विमल चैतन्य ।**
**ते तुम्हीच आहां दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥**

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
श्री साईलीला



# सत्संग

– शाम जुवळे

साई-संग हा सत्यार्थाने सत्संग होय. शाश्वत (अविनाशी) अस्तित्वाचा संग हा जगाच्या द्वंद्व-भूमिकेपलिकडील असल्यामुळे अंश-मन पूर्णत्वात सामिल होत असते. शाश्वत अस्तित्व हे नित्य पूर्णत्वाने भरलेले असते. अनादि-अनंत असे हे शाश्वत अस्तित्व आहे. प्रभू रामचंद्र हे या शाश्वत (चिरंतन) अस्तित्वाचे प्रत्यक्ष प्रमाण आहे. विश्वाचे सत्य 'रामायण' या ग्रंथात ग्रंथित करून ठेवलेले आहे. या सत्याचा पुनरूच्चार भगवद्‌गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने केलेला आहे. याच सत्याचे प्रात्यक्षिक श्री साईबाबांनी स्वत:च्या प्रत्यक्ष आचरणाने करून दाखविले आहे आणि आजही ते सत्य भक्तांच्या नजरेसमोर आहे. सर्व विचारांचे आगर 'हृदय' हेच आहे. या विचारांवर प्रत्येक कर्म आधारित असते. जसे कर्म तसे त्याचे परिणाम घडत असतात. म्हणून प्रत्येक कर्माचा हेतू शुद्ध व पवित्र असावाच लागतो. हेतु शुद्ध व पवित्र ठेवल्याने त्यापासून घडणारे विश्व शुद्ध व पवित्र राखले जाते. याच्या उलट मानवाचे कर्म अशुद्ध व अपवित्र असल्यास विश्व बिघडले जाऊन त्याचे घातक परिणाम मानव जातीस भोगावेच लागतात.

नित्य-शाश्वत असा देव आणि शक्तीद्वारा विश्व सांभाळणारी देवी (नियति) यांच्यातील अतूट ऐक्य म्हणजे अद्वैत होय. हे ऐक्य व्यवहारी जीवनात काटेकोरपणे पाळण्यासाठी मन नित्य शुद्ध आणि पवित्र राखता येणे अत्यावश्यकच ठरते. यादृष्टीने पहाता वेदान्त आणि व्यवहार यांची फारकत करणे असूज्ञतेचे ठरत असते. मानवी जीवन निष्कलंक राखणे हेच सुयोग्य शिक्षण प्रभू रामचंद्राने अखिल जगास देवून ठेवले आहे. कर्तव्याचे पालन करताना भावनेवर नियंत्रण ठेवावे लागते, हे प्रभू रामचंद्राने स्वत:च्या जीवनावरून सर्व जगास दाखवून दिलेले आहे. अशा प्रसंगी तडजोड करता येत नाही; हेही प्रभू रामचंद्रांनी सांगून ठेवले आहे. जीवन हे चैन करण्यासाठी दिलेले नसून चैतन्याचा सन्मान राखून प्रत्येक कर्म सुयोग्यतेने करण्यासाठी जीवन आयोजिलेले आहे. देहाचे व्यापार, देह करीत असता मन सदासर्वकाळ नित्याशी निगडीत राहील असे वागणे जीवनात श्रेयस्कर ठरते हेच येथील 'सत्य' होय.

मनाच्या पातळीवर श्री साईबाबांचा सत्संग म्हणजे जीवा-शिवाचे ऐक्य होय. या ऐक्याचा आनंद हा प्रशांती प्रसवणारा असल्यामुळे अभूतपूर्व असाच असतो. हा सत्संग साईचे दिव्य-दर्शन घडवून आणीत असतो.

**साईचे हे दर्शन अवघे**
**दिव्यत्वाचि प्रचिती असे ।**
**दर्शनमात्रें शान्ति गवतसे**
**असे एकचि एक असे ॥१॥**

**ऐक्य हेचि जिवाशिवाचे**
**नित्यत्वाचि खूण असे ।**
**शुद्धत्वाला शुद्ध मिळतसे**
**विश्वचि अवघे यात वसे ॥२॥**

**ॐकारातुनि शब्द येति ते**
**आत्म्याचा संकेत असे ।**
**प्रेम देवुनि प्रेमचि घ्यावे**
**हेचि येथिल कार्य असे ॥३॥**

**कर्तव्याचे क्षेत्र साईचे**
**निर्मलतेचा दीप असे ।**
**ज्ञानाचा हा प्रकाश पसरे**
**भूलोकीचा स्वर्ग असे ॥४॥**

**दृश्य लोपुनि दर्शन घडते**
**द्रष्टाही साईत वसे ।**
**दिव्यत्वाचि ज्योत सांगते**
**साईची ही लिला असे ॥५॥**

देहाचा मंगल कलश साईच्या प्रेमाने परिपूर्ण भरलेला असला म्हणजे तेथे इतर कशालाही प्रवेश मिळत नाही. साईच्या सत्संगाची ही खास खूण आहे. परिपूर्ण तृप्तीचा हा ढेकर होय. खरे म्हणजे सत्संग हा इतर लोकांच्यात मिसळून करण्यापेक्षा साईच्या चिंतनातच सत्संग सत्यार्थाने लाभत असतो हे अनुभवाने जाणावे हेच श्रेयस्कर ठरते. साईच्या सत्संगात मनाची व्यर्थ होणारी धावपळ थांबली जाते आणि मन प्रशान्तीच्या माहेरी येवुन विसावते. पर्जन्य पडल्यावर जमिनीला जसा ओलावा लाभतो त्याप्रमाणे साईच्या सत्संगानंतर साई-कृपेचा जिव्हाळा (प्रेम) लाभतच असतो.

❑❑❑

# श्री साईसच्चरित पारायणाचे अनुभव

– माधवराव भागवत

— ❖ ❖ ❖ —

**कै. हेमाडपंत लिखित 'श्री साईसच्चरित' हा ग्रंथ साईभक्तांची 'गीता-ज्ञानेश्वरी'च आहे. या ग्रंथाच्या नित्य पारायणाने - नित्य वाचनाने अनेक भक्तांना अनेक अनुभव आलेले आहेत. पैकी साईभक्त श्री. भागवत यांनी कथन केलेले काही अनुभव....**

— ❖ ❖ ❖ —



**हेमाडपंत : श्री साईसच्चरित पोथीचे लेखक**

प्रस्तुत लेखाचा विषय आहे की, कै. अण्णासाहेब दाभोळकर लिखीत 'श्री साईसत्चरित' वाचल्यावर अथवा त्याचे सतत पारायण केल्यावर काय अनुभव येतात. प्रथम एका गोष्टीचा विचार आपण केला पाहिजे, तो म्हणजे हा की, 'श्री साईबाबा' हे 'विश्वगुरु' होते. त्यांच्या हयातीत व समाधीनंतरहि त्यांचे भक्तगण साऱ्या जगभर असंख्य, अगणित असे विखुरलेले आहेत. जे स्वत:ला 'साईभक्त' म्हणवून घेण्यात धन्यता मानतात. त्या सर्वांना अनुभव निश्चित आलेले असणार, नव्हे आलेलेच आहेत व त्यांनी ते 'अनुभव' पुस्तकरुपाने विविध भाषांत व विविध देशात लिहून ठेवलेले

आहेत, म्हणजे सर्वच 'साईसाहित्य' आम्हाला माहित आहे, असा दावा कुणी करू नये, व कुणी करणारही नाही. दुसरी गोष्ट 'संतचरित्र' हे सर्व प्रकट, प्रसिद्ध, प्रचलित झालेले असते असे नाही, त्यातला पुष्कळसा भाग 'अज्ञात' असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातून 'श्री साईबाबा' हे तर उच्चकोटीतील 'संतशिरोमणी' होतेच. तसेच ते 'परब्रह्मस्वरुप' होते, म्हणून त्यांचे चरित्र व अनुभव लिहिण्यास बुद्धि, कागद व शाई हे अपुरेच पडेल ही गोष्ट निश्चितच आहे. त्यातही माझ्यासारख्याने तो प्रयत्न करणे म्हणजे 'हास्यास्पद' तर आहेच, पण टिटवीने मेरु पर्वत उल्लंघन करण्यासारखे आहे. म्हणून मी फक्त हा 'माझ्यापुरताच' व माझ्या बुद्धिची झेप जिथपर्यंत जाईल, तिथपर्यंतच करणार आहे. माझ्या आवाक्याप्रमाणेच मी झेप घेणार आहे. व तो अल्प असा 'प्रांजळ प्रयत्न' असणार आहे. सर्वेसर्वा श्री साईनाथच आहेत, मी फक्त कारण आहे, कारण **आपुल्या बळे नाही मी बोलता। बोलविता एक श्री साईनाथा।** या उक्तीप्रमाणे लिहित आहे. वाचकांनी हा 'अल्पप्रयत्न' गोड मानून घ्यावा.

आता 'साईसत्चरित्र साहित्य' किती अफाट असू शकेल याची कल्पना वाचकांना वरील विवेचनावरून आली असेलच. एक गोष्ट मात्र निश्चित खरी की, त्या सर्व साईचरित्र साहित्यापैकी मान्यता पावले ते मात्र कै. अण्णासाहेब दाभोळकर यांचे श्री साईचरित्र, आज जगभर त्याच साईचरित्राचे वाचन व सतत पारायणही होत असते हे आपणही जाणताच. श्री साईचरित्रे अनेकांनी लिहिली पण, कै. अण्णासाहेब दाभोळकर लिखित **'श्री साईसच्चरिताची'** गोडी अवीटच ! त्यातील भाषा, लेखनशैली, कथा व कथानक यांची योजनाबद्ध जुळणी, वाचकाला सहज समजतील असे शब्द, प्रसंगी वाचकांच मन भारावून जावे व वाचक साधकांचे हात साईप्रणामासाठी नकळत जुळले जावेत व बाबांना मन:पूर्वक वंदन घडावे, इतकी किमया त्यात निश्चितच आहे. लेखकाचे बुद्धिचातुर्य तर ठायी ठायी दिसून येते, यावरुन हेच म्हणावेसे वाटते, **तेथे पाहिजे जातीचे। येरा गबाळाचे काम नोहे।** दुसरी गोष्ट संकल्प अन् सिद्धी यात खूप अंतर आहे. मनुष्य फक्त संकल्पच करु शकतो, पण सिद्धि ही केवळ ईश्वराचेच हाती आहे, हेच निश्चित, पण तरीही **सत्य संकल्पाचा। दाता भगवान।** या उक्तीप्रमाणे असेच म्हणावे लागेल की, बाबांची 'पूर्णकृपा' कै. अण्णासाहेब दाभोळकर यांच्यावर होती, म्हणूनच त्यांचे श्री सांईसत्चरित जगन्मान्य झाले, जनमानसात 'मानाचे स्थान' पटकावते झाले, असो.

आता वाचन हे दोन प्रकारचे असते, एक वाचकाच्या दृष्टीकोनातून केलेले वाचन व दुसरे म्हणजे साधक व साधनाचे दृष्टीकोनातून केलेले वाचन व सततचे पारायण, आता वाचकाच्या दृष्टीकोनातून केलेले वाचन हे वाचनासाठी केलेले वाचन व वरवरचे असते, त्यामुळे त्याचे अनुभव, अनुभूती, प्रचिती, हीहि त्याचप्रकारची म्हणजे तात्कालिक, प्रसंगरुपाने, घटनारुपाने, दृष्यरुपाने येईल. तसे अनुभव मलाही खूप आलेले आहेत, आजही येत आहेत. पण ते क्षणिक असतात, म्हणून अनुभव हे वास्तववादी, चिरस्थायी व शाश्वत स्वरुपाचे असावेत, ते कायम आपल्या हृदयात 'घर' करून असतात, जेणेकरुन भक्ती, भावना स्थिर होते व नित्य सेवा घडते, आणि आपण खऱ्या अर्थाने भक्त होतो, भक्त म्हणजे आपल्या दैवतापासून जो कधीही 'विभक्त' होत नाही तो सच्चा भक्त, 'साईभक्त' आपण तसे साईभक्त होतो. हाच या ग्रंथवाचनाचा व पारायणाचा माझा 'अनुभव' आहे.

वाचकांच्या व साईभक्तांच्या व भाविक भक्तांच्या दृष्टीकोनातून आलेले अनुभव व त्याचे स्वरुप हे निश्चित वेगळेच असते. वाचकांच्या दृष्टीकोनातून आलेल्या अनुभवाचे कथन मी वर केलेच आहे,आता साधक, साईभक्त, भाविक यांच्या दृष्टीकोनातून आलेल्या अनुभवांचे स्वरुप कसे असते ते पाहू. याचे स्वरुप दृश्यात्मक, प्रसंगात्मक, घटनात्मक नसेल तर, ते ज्ञानाधिष्ठित, सैद्धांतिक व शाश्वत स्वरुपांचे, परिवर्तनात्मक स्वरुपाचे असेल. जसे - बाबांना यौगिक क्रिया चांगल्याच अवगत होत्या, नव्हे ते **'योगीराज'** होते. त्यांना योगांचे परिपूर्ण ज्ञान व योगांची माहिती होती. त्यांना 'खंडयोग' माहीत होता. बाबांना चारी वेदांचे ज्ञान परीपूर्ण होते, त्यांना सर्व सिद्धि अवगत होत्या, नव्हे त्या वश होत्या, त्यांचा शब्द झेलायला, त्या सदा तत्पर असत, ते उत्तमपैकी धन्वंतरी होते, ते उत्तमपैकी साधकाचे साधनेने झालेले 'सिद्ध' होते. म्हणूनच त्यांची चराचरावर अबाधित सत्ता होती, त्यावर त्यांचे पूर्ण नियंत्रण होते, त्यांचे धन्वंतरीपण हे असे साधनेतून प्राप्त झालेले असल्यामुळे त्यांच्या हाताला हमखास यश असे. त्यांच्या हाताला गुण होता. योजना जरी विचित्र स्वरुपाची वाटली तरी हमखास गुणकारक होती. ते साक्षात परमेश्वरच होते. ते परब्रह्मस्वरुपच होते. म्हणूनच त्यांच्या हातून माणसांची बुद्धि चक्रावून कुंठीतच व्हावी अशा अगाध लीला, चमत्कार घडले, जे सामान्य माणूस कधीच करु शकणार नाही, ते फक्त परब्रह्मस्वरुपालाच, परमेश्वरालाच शक्य आहे, आणि म्हणूनच ते साक्षात् परमेश्वरच आहेत. साधनेने त्यांच्या अंगी अतिलीनता आली होती व म्हणूनच ते स्वत:ला अल्लाचा बंदा, सेवक म्हणवून घेत, त्यांनी कधीही मी परमेश्वर आहे असे

म्हटलेच नाही, पण असंख्य लोकांना विविध देवतांच्या स्वरुपात दर्शने दिल्याचे दाखले मात्र आढळतात. असे अनुभव साधक व साधनेच्या दृष्टीने 'अत्यंत मौलिक' असल्याने ते चिरस्थायी, चिरंतन, शाश्वत स्वरुपाचे, ज्याला आत्मज्ञान, ज्ञान, तत्वज्ञान असे म्हणतो त्या स्वरुपाचे असतात. श्री साईसच्चरिताच्या पारायणाने भक्ताच्या जीवनाला निश्चित दिशा मिळते व तो मार्गक्रमणा करुन अंती ध्येयाप्रत पोचतो व नि:स्सीम 'साईभक्त' बनतो. म्हणून या ग्रंथाच्या वाचनाने, सतत पारायणाने हा अनुभव निश्चित येतो.

कै. अण्णासाहेब दाभोळकरांचे श्री साईसच्चरित व इतर अन्य 'साईसाहित्य' यात हा जमीन अस्मानाचा फरक आहे, त्याचे लेखन हे परावाणीतून झालेले आहे, त्याला परतत्वाचा स्पर्श आहे, त्यामुळेच ते लगेच वाचकांच्या, साधकांच्या, साईभक्तांच्या मनाचा तात्काळ ठाव घेते. साधक 'अंतर्मुख' बनतो, इतकेच नव्हे तर, तो 'साधकाचा सिद्ध' होतो. त्याला बाबांची 'कृपाशक्ती' प्राप्त होते व तो अलौकिक असे 'साईकार्य' अगदी विनासायास करु शकतो, पार पाडतो.

आपल्या हिंदू धर्मात चार वेद आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद व सामवेद, आणि ते 'अपौरुषेय' आहेत असे मानतात. आता अपौरुषेय आहेत, याचा अर्थ ते कुणी मनुष्यांनी, मानवांनी निर्माण केलेले नाहीत तर, ते प्रत्यक्ष परमेश्वरानेच निर्माण केले. म्हणूनच त्यांना 'अपौरुषेय' म्हणायचे. त्यात मानव जीवनाचं, समाज जीवनाचं यथार्थ मार्गदर्शनात्मक वर्णन आहे, अन् आपले हे 'साईसच्चरित' हा तर 'पाचवा वेद'च मानला जातो. कारण त्यातही मानवी जीवनाचे, समाज जीवनाचे यथार्थ वर्णनात्मक 'मार्गदर्शन' आहे. त्यामुळे ते वाचल्याने अथवा त्याचे सतत पारायण केल्याने माणूस नास्तिक असेल तर, 'आस्तिक' झालाच पाहिजे इतकी शक्ती त्यात आहे. हा माझा स्वत:चा अनुभव आहे, याला पुष्टी म्हणून कै. केशव रामचंद्र प्रधानांचे उदाहरण अत्यंत परिणामक असे ठरेल. आता 'श्री साईसत्चरित्र' हा ग्रंथसुद्धा 'अपौरुषेय' आहे याबद्दल निदान माझे तरी दुमत नाही. कारण 'साईबाबा' हे परब्रह्मस्वरुपच होते. म्हणजेच ते साक्षात् परमेश्वरच होते. याचे दाखले श्री. अण्णासाहेब दाभोळकरांच्या ग्रंथात जागोजाग आढळतात. प्रसंगोप्रसंगी बाबांनीच सांगितलेले आहेत, त्याला पुष्टीही मिळते. कै. अण्णासाहेब दाभोळकर हे निमित्तमात्र आहेत. खरे तर बाबांनीच आपले चरित्र कै. अण्णासाहेब दाभोळकर यांचे हस्ते लिहिवले आहे. कै. अण्णासाहेब निमित्तमात्र आहेत, सर्वेसर्वा श्री साईच आहेत, अन् म्हणूनच त्या ग्रंथात एक अद्वितीय अशी किमया भरली आहे, श्री साईबाबा हे उत्कृष्ठ जादूगार होते, किमयागार होते, याचाच प्रत्यय, अनुभव येतो. बाबांना दत्तावतारी मानतात, बाबांच्या, साईंच्या, 'साईलीला' पाहिल्या की, वाचल्या की, त्याचे सतत पारायण केले की, ऐकल्या की मन थक्क होते, अन् तशा 'लीला' आजही घडतात, अन् त्याही साई समाधीनंतर इतक्या वर्षांनी, म्हणूनच असंच म्हणावं लागतं, हे काम निश्चितच मानवाचं नाही, ते परमेश्वराचंच आहे. बाबांनी कधीही उपदेशाचे डोस पाजले नाहीत, तर प्रसंगनिर्मिती करून, त्यातून अनुभूती, प्रचिती, अनुभव देऊन, अनुभवाने भक्ताला शहाणपण प्राप्त करुन दिले. सर्वधर्मसमभाव हा त्यांचा स्थायीभाव होता. दुसऱ्याच्या धर्मात, साधनेत, आराध्य दैवताच्या बाबतीत त्यांनी कधीही हस्तक्षेप केला नाही. ते नेहमी सांगत अपना तकीया छोडना नही। त्यामुळे त्यांचे सर्वधर्मीय, जातीय, पंथीय भक्तगण होते. सर्वांना समान वागणूक असे, तिथे उच्चनीच हा भेद नसे. त्यांचे सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित, शास्त्री, पंडित, विद्वान, अडाणी सर्वप्रकारचे भक्त होते.

**आधी केले। मग सांगितले।** या उक्तीप्रमाणे त्यांचे वर्तन होते, नाहीतर **लोका सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडे पाषाण।** असे ते नव्हते. आधी कृती, मगच उक्ती असे ते होते. गुरु, गुरुतत्व, गुरुपरंपरा, गुरुसेवा यांचे त्यांनी स्वत: जतन केले होते. त्यांनी कधीही कोणत्याही धर्मात ढवळाढवळ केली नाही. प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याची मुभा दिली. स्वत: 'परब्रह्मस्वरुप' असून, लोकही त्यांना दत्ताचा पाचवा अवतार मानत, असे असून त्यांनी मी परमेश्वर आहे असे कधी चुकूनही म्हटले नाही, उलट ते नेहमी म्हणत मी अल्लाचा बंदा आहे, गुलाम आहे, सेवक आहे, ते नेहमी अल्ला भला करेगा असेच म्हणत. साधनेतून आलेली अतीलीनता त्यांचे ठायी होती आणि ती भक्तांचे अंगीही यावी अशीच त्यांची अपेक्षा होती. हाच त्यांचा 'चांगुलपणा' होय.

**बुडती हे जन। पाहवेना डोळा। म्हणून कळवळा येत आहे।** याच एका दृष्टीकोनातून त्यांचे कार्य होते. संत ही **'ऐशी कळवळ्याची जाती। लाभाविण करी प्रीती।'** म्हणूनच बाबांनी असंख्य पतितांना पावन केले, अन् आजही करीत आहेत. हाच 'मौलिक अनुभव' साईचरित्र वाचनाने, पारायणाने येतो.

हरी ओम् तत्सत्। ॐ श्री साईनाथाय नम:।

❑❑❑

# सकल संत कार्यगौरव
# (संत आणि उद्यमशीलता)


– ह. ल. रानडे, सातारा.

— ❖ ❖ ❖ —

**संत म्हणजे टाळकुटे-निरुद्योगी अशी सर्वत्र उच्चशिक्षित समाज संतांची हेटाळणी करताना आढळतो. त्यासाठी संतांचे काही निवृत्तीमार्गी उद्गारही पुढे केले जातात. संत हे निवृत्तीमार्गी नव्हे तर प्रवृत्तीमार्गी आहेत हे समजून देण्यास श्री. रानडे यांचा प्रस्तुतचा 'संत व उद्यमशीलता' हा लेख चिंतनीय ठरेल असे वाटते. आपला अभिप्राय जरुर कळवा.**

— ❖ ❖ ❖ —

**''आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्यो महारिपु: ।'' ''उद्येमेन हि सिद्धन्ति कार्याणि न मनोरथै: ।'' ''उद्योगाचे घरी ऋद्धि सिद्धि पाणी भरी''** "THEY RUST WHO REST" "CHANGE OF OCCUPATION IS REST" वगैरे वचने आपल्याला माणसाच्या जीवनात उद्योगाला केवढे महत्त्वाचे स्थान आहे हे विशद करुन सांगतात. तरी सुद्धा पुष्कळशी माणसे आपले काम व्यवस्थित बिनतक्रार आनंदाने व प्रामाणिकपणे करताना आढळत नाहीत. काम कसे चुकविता येईल किंवा ते ? कसे उडवता येईल अशी साधारपणे माणसांची वृत्ती आढळून येते. एवढे करूनही काम अंगावर पडलेच तर ते पाट्या टाकल्याप्रमाणे करून त्यात अंगचुकारपणा करून टाकायचे ते कसेतरी करून टाकतात. वास्तविक भगवंताने ही सृष्टी जेव्हा निर्माण केली तेव्हा प्रत्येक मानवाच्या मागे त्याने काही ना काही उद्योग लावून दिला व प्रत्येकाने तो अगदी सर्वांना आवडेल अशा तऱ्हेने करण्याचे दंडक पण घालून दिला. आपल्या वाट्यास आलेले काम कसे करावयाचे हे पण भगवंताने स्पष्टपणे सांगितले. आपले कर्म करताना ते अगदी आनंदाने, प्रामाणिकपणे, मनापासून निरहंकार वृत्ताने, भगवंताच्या पूजेप्रमाणे ते भगवंत पहात आहे याचे भान ठेवून करावयाचे. शिवाय कर्म संपल्यावर तेच कर्म भगवंताला अर्पण करून टाकावयाचे. हा महान संदेश दुसऱ्या कोणी दिला नसून साक्षात् श्रीकृष्णप्रभूंनी अर्जुनाचे निमित्त करून अखिल मानवजातीस दिला. हा दिव्य संदेश समस्त मानवजातीने आचरणात आणला तर तिचे कल्याण झाल्याशिवाय कसे बरे राहील?



उद्यमशीलतेचा वरील जो संदेश भगवंताने गीतमध्ये सांगितला त्याचे सर्व संतमंडळींनी अगदी तंतोतंत पालन केले व त्याबाबतचा वस्तुपाठच सामान्य जनतेपुढे ठेवला. ''आधी केले मग सांगितले'' या न्यायाने संताच्या उक्तीला कृतीची जोड असल्यामुळे सामान्य माणसांना कर्माचे महत्त्व जास्त स्पष्ट झाले. नुसत्या नामस्मरणाने अगर अन्य कोणत्या उपासनेने भगवंत प्राप्ती होणार नाही तर त्याबरोबरच विहित कर्तव्य अगदी काळजीपूर्वक करावयास हवे. कारण कर्म करणे जर बंद पडले तर जगाचा सर्व कारभारच ठप्प होईल ना ! शिवाय कर्म करता करताच मानवाची चित्तशुद्धी कशी होते व त्याच्या मनातील काम, क्रोध, लोभ वगैरे षड्रिपू आपले ठाण कसे हलवतात व त्यापुढे हृदयामध्ये

भगवंत प्रगट होऊन शेवटी त्यातूनच मोक्षप्राप्ती होऊ शकते हे संतांनी सोदाहरण दाखवून दिले. ''मामनुस्मर युद्धच'' हा गीतेचा सर्व संतांनी आचरणात आणून सर्वांना कार्यप्रवण केले.

आता निरनिराळ्या संतांना आपापला उद्योग न सोडता जनजागरणाचे अनमोल कार्य करून सर्वांना मोक्षप्राप्तीचा मार्ग कसा उलगडून दाखविला हे जरा विस्ताराने पाहू या.

ज्ञानेश्वर हे जन्मतःच सिद्धपुरुष. त्यांना तर जीवनात काहीच मिळवावयाचे नव्हते. तरी सुद्धा आपल्याला जी सिद्धी प्राप्त झाली तरी त्यांनी आपल्या पुरतीच मर्यादित न ठेवता त्याचे रहस्य जनसामान्यांसाठी खुले करून दिले. लोकांमधील अज्ञान, दारिद्र्य, विषमता, अंधश्रद्धा, भीती, असहिष्णुता व निष्क्रियता दूर करून त्यांच्यातील पौरुष जागे करून त्यांना कार्यप्रवण करण्यासाठी त्यांना खूप हालअपेष्टा, अवहेलना व अपमानीपण सहन केला. खरा मानवधर्म समजावून सांगण्यासाठी त्यांना जागोजाग धर्मसंकीर्तने करावी लागली व त्यातून त्यांनी मानवाचे या जगातली स्थान, त्याचे कर्तव्य, त्याचे जगाशी व जगदीशाशी असलेले नाते, भगवंताचा हा विश्वाचा पसारा निर्माण करण्याचा हेतू, जीवात्मा व परमात्मा यांचे नाते, शरीराचे नश्वरत्व व आत्म्याचे अमरत्व वगैरे बाबत समाजपुरुषाला जागृत करण्यासाठी अथक परिश्रम केले. सदर ज्ञान सामान्य जनतेला मिळत रहावे व ते सतत त्यांच्या डोळ्यासमोर रहावे म्हणून त्यांनी संस्कृत भाषेतील जो महान ग्रंथ भगवद्गीता त्यावर प्राकृतभाषेत ज्ञानेश्वरी हा अलौकिक ग्रंथ निर्माण केला. त्यांनी वारकरी संप्रदायाची स्थापना करून समाजातील सर्व थरातील लोकांना त्याकडे आकृष्ट केले व आपल्या कीर्तन प्रवचनातून सर्व जातीच्या मंडळींना भगवंतप्राप्ती करून घेणे कसे शक्य आहे हे अगदी सोप्या भाषेत प्रतिपादन केले. त्यासाठी सामान्य माणसांना धर्माची संकल्पना विशद करून सांगितली. सर्व प्राणीमात्रांबद्दल दया, सर्वांभूती भगवद्भाव पहाणे, आपपरभाव न ठेवता सर्वांना समान वागणूक देणे, मन सदैव प्रसन्न व ताब्यात ठेवणे. कशाचीही आसक्ती न ठेवता सतत कार्य करत रहाणे व ते करत असताना अखंड नामस्मरण करणे म्हणजे धर्म हे स्पष्ट करून सांगितले. त्याच वेळी त्यांनी स्वतः त्याप्रमाणे आचरण करून दाखविले व जनतेला अज्ञान तिमिरातून बाहेर काढण्याचा अविरत प्रयत्न केला. एवढ्यावरच न थांबता सामान्य माणसाला परमेश्वराकडे जाण्यासाठी म्हणून अगदी सोपा, सरळ व सुटसुटीत व काहीही खर्चात न टाकणारा असा मार्ग म्हणजे नामसंकीर्तन. या नामसंकीर्तनाचे महत्त्व ज्ञानदेवांनी ''हरिपाठ'' नावाच्या लघुज्ञानेश्वरी समजल्या जाणाऱ्या छोट्या ग्रंथात अगदी सोप्या मराठी भाषेत प्रतिपादन केले. मानवाचने आपला दैनंदिन व्यवहार न सोडता हे पारलौकिक यशस्विता नामस्मरणाने कशी प्राप्त करून घ्यावी हे जनता जनार्दनापुढे मांडले. नामस्मरणामध्ये एवढी ताकद असल्यामुळे हा हरिपाठ वारकरी मंडळींच्या गळ्यातील ताईतच बनून राहिलाय! थोडक्यात सांगावयाचे झाल्यास ज्ञानदेवांनी जीवनाचे अत्युच्च ध्येय गाठण्यासाठी कर्माच्या माध्यमातून जावयास हवे व ते कर्म नामस्मरणाच्या धाग्यात गुंफावयास हेच हे स्पष्ट करून अखिल मानवजातीस कार्यप्रवण केले.

**॥ संतशिरोमणी नामदेव ॥**

ज्ञानेश्वरांच्या आग्रहावरूनच संत नामदेव महाराजांनी भारतभर भ्रमण करून कीर्तनाद्वारे ज्ञानदीप लावला. आपल्या धर्मसंकीर्तनामधून त्यांनी मानवधर्म म्हणजे काय तो कसा आचरावयास हवा, त्यासाठी कर्ममार्ग कसा आवश्यक, कर्ममार्गावर वाटचाल करताना कोणकोणती पथ्ये पाळावयास हवीत हे जनता जनार्दनाला स्वतःच्या आचरणातून व अनेक दृष्टांतातून पटवून दिले. अखिल मानवजात कशी एकसंध आहे व त्यांच्यामध्ये भेदाभेद करणे अन्यायकारक आहे हे सांगण्यासाठी पंजाब प्रांतापर्यंत त्यांनी भ्रमंती केली याबाबत महत्त्वाची गोष्ट म्हणजे नामदेवांनी हे धर्मसंकीर्तन चालू असताना आपला शिंपी व्यवसाय कमीपणाचा मानला नाही व तो सोडला नाही. कारण मानवान आपले प्राप्त कर्तव्य जर सोडले तर तो विठ्ठलाला मुळीच आवडणार नाही हे त्यांनी जाणलेले होते. विहित कर्तव्य न सोडता ते समर्पित भावनेने करून ते करीत करीतच भगवद्भक्ती करण्याचा केवढा हा मोलाचा संदेश.

**॥ जगद्गुरु तुकाराम ॥**

तुकाराम हे तर व्यापार उदीम करणारे. पण विठ्ठल चरणाचा ध्यास लागून सर्वत्र परब्रह्म भरलेले आहे ह्याची जाणीव होत



असतांना सुद्धा त्यांनी आपल्या व्यापारधंदा सोडला नाही. एवढेच नव्हे तर तो नेकीने व प्रामाणिकपणे करीत राहिले. सर्वांकडे समभावाने पहाण्याची दृष्टी असल्यामुळे व सर्व संताप्रमाणे त्यांनी अगदी भोळीभाबडी वृत्ती असल्यामुळे त्यांना लोकांनी फसविले व त्यांना व्यापारात खोट आली. पण त्यात त्यांनी विषाद मानला नाही व ती पांडुरंगाची इच्छा मानून लोकापवाद पण सहन केला. भरीत भर म्हणूनच की काय दुष्काळाचा पण त्यांना जबर फटका सहन करावा लागला व्हावयाची ती पण पार बुडाली. पण त्यांनी पांडुरंगाला दोष कधीच दिला नाही. उलट ''बरे झाले देवा'' म्हणून त्या घटनेचे स्वागतच केले. व आता तरी मला संपूर्ण लक्ष तुझे चरणी देता येईल म्हणून पांडुरंगाचे आभारच मानले. सहधर्मचारिणी सुद्धा विभिन्न स्वभावाची मिळून वती वेडेवाकडे बोलून त्यांचा व पांडुरंगाचा सतत अपवाद करीत असताना सुद्धा त्यांनी आपला तोल कधीच जाऊ दिला नाही तर त्याबद्दल पांडुरंगाजवळ तक्रार केली नाही किंवा बायकोला सोडून अरण्यात पळून पण गेले नाहीत. उलट अशी बायको मिळाल्यामुळे आपण संसारात गुंतून पडलो नाही व त्यामुळेच पांडुरंगचरणी सेवा जास्त करता आली याबद्दल धन्यताच मानली. राखावयास घेतलेल्या शेतातील सर्व धान्य पाखरांनी फस्त केले तरी ते मुळीच संतप्त झाले नाहीत कारण ते पाखरांमध्येही भगवंताचेच रूप पहात होते. त्यांचा भोळाभाळ, प्रखर वैराग्य व पांडुरंगाबद्दलची नितांत श्रद्धा पाहून अनेक भक्त पण त्यांच्या पायावर डोके ठेवून त्यांच्याबद्दलचा नितांत आदर व्यक्त करीत. व त्यांनी तयार केलेल्या अभंगांचे नित्य पठण करीत. पण तुकाराम महाराजांचा हा मोठेपणा त्यांच्या काळच्या तथाकथित विद्वानांना मुळीच सहन झाला नाही म्हणून त्या विद्वानानमंडीळींनी तुकाराममहाराजांनी रचलेल्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडवून टाकल्या तरी सुद्धा तुकाराममहाराजांनी ती पांडुरंगाची इच्छा मानली व ब्रह्मवृदांना त्याबद्दल अपशब्द बोलून आपली निष्ठा विटाळली नाही. इंद्रायणीच्या काठी ते तसेच काही दिवस पांडुरंगाचे स्मरण करीत बसले आणि काय आश्चर्य एके दिवशी त्यांचे ते अभंग इंद्रायणीतून वर आले व ते आजतागायत अभंगच राहिले. **''बुडती हे जन न देखवे डोळा । हिताचा कळवळा येतो त्यांचा''** या त्यांच्या अभंगात सांगितल्याप्रमाणे त्यांना सामान्य माणसांच्या उद्धाराचीच अखंड तळमळ लागली होती व त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी कीर्तने करून साधू कसे ओळखावेत. भोंदू लोकांपासून सावध कसे रहावे, पाप कर्म कोणते व पुण्यकर्म कोणते (पुण्य परउपकार पाप ते परपीडा) जीवनामध्ये समर्पित भावनेने व अयाचित वृत्तीने (काही न मागे कोणाशी, तोचि आवडे देवाशी)विहित कर्तव्य करणे कसे आवश्यक आहे व अशा कर्मद्वारेच या जीवाच्या येरझारा चुकविणे कसे शक्य आहे म्हणजेच पांडुरंगाशी एकात्मकता कशी प्राप्त करून घेता येईल हे अगदी सोप्य साध्या व जनसामान्यांच्याच भाषेत त्यांना समजावून सांगण्याचे अतिशय महत्त्वाचे काम केले. या त्यांच्या जगदोद्धाराच्या तळमळीच्या कार्याबद्दल जनता जनार्दनाने त्यांना **जगद् गुरू** ही मानाची पदवी बहाल केली. जनसेवा हीच ईश्वरसेवा (जे का रंजले गांजले...) हा महत्त्वाचा कानमंत्र देऊन त्यांनी जे अनमोल कार्य केले त्याला तोड नाही.

### ॥ जनाईचे महात्म्य ॥

संत जनाबाई सुद्धा अंतकाळी पांडुरंगचरणी विलीन झाली. पण त्यासाठी ती आपले काम सोडून नुसती विठ्ठलाच्या नामाचा गजर करीत राहिली नाही. तो गजर चालू असताना ती आपल्या कामात दंग असे. गोऱ्या थापण्याचे काम तसे किती कमीपणाचे पण जनाबाईने तसे न मानता ते काम कधीच कंटाळा न करता, अगदी मनापासून, प्रामाणिकपणे, भगवंतआज्ञा मानून ते ईश्वरार्पण बुद्धीने केले. पायली पायली दळण दळण्याचे काम पण ते काम सुद्धा ती निष्ठेने व व भगवद्भजनात रंगून जाऊन करती असे. एवढे दळण दळावयास लागते म्हणून तिने राग कधीच केला नाही. आणि म्हणूनच तिचे काम हलके करण्यासाठी साक्षात् पांडुरंग तिला दळण दळण्यास मदत करीत असे केवढे हे जनाबाईचे भाग्य ! पांडुरंग स्मरणातच ती सतत कार्यमग्न असल्यामुळे ज्यावेळी जनीच्या गोवऱ्या ओळखण्याचा प्रसंग आला तेव्हा जी गोवरी कानाला लावल्यावर त्यातून ''विठ्ठल विठ्ठल'' असा प्रतिध्वनी येईल ती जनीची गोवरी असा संतसज्जनांनी निर्वाळा दिला. पण तिला जे सामर्थ्य प्राप्त झाले त्याचे कारण म्हणजे ती जे काम करत होती ते विठ्ठलाची आज्ञा म्हणून. एवढेच नव्हे तर आपण जर ते केले नाहीत तर पांडुरंग आपल्याला जाब विचारील व मग त्याचे उत्तर देणे खूपच अवघड जाईल अशी तिची भावना होती. कर्तव्यावर अपार प्रेम करून ते सद्सद्‌विवेकबुद्धी जागृत ठेवून ''कर्मे ईशू भजावा'' ही ज्ञानदेवोक्ती हृदयात कोरून ठेवून कर्म केल्यास ईश्वर कसा सहाय्य करतो व जीवनाचे अंतिम ध्येय त्यामुळे कसे प्राप्त होऊ शकते हे संत जनाबाईंच्या चरित्रापासून आपण शिकू या ना !

### ॥ कबीरांची कर्मनिष्ठा ॥

संत कबीरदास हे तर विणकर समाजतले. त्यांनी पण माग चालविण्याचा आपला धंदा कधीच सोडला नाही एवढेच नव्हे तर तो धंदा सतत ईश्वरस्मरणात दंग होऊनच केला. म्हणूनच कौसल्येचा राम त्यांना त्या कामात मदत करू लागला. भक्तांचे काम करण्यास भगवंताला कधीच कमीपणा वाटत नसल्यामुळे रामराया कबीराचे शेले विणत असे. केवढे हे कबीराचे भाग्य !

आपल्या घराण्यात चालत आलेला व्यवसाय मुळीच कमीपणाचा न मानता व तो सोडून न देता तो निष्ठेने भगवदाज्ञा म्हणून करत रहावयाचा व तो ईश्वरस्मरणात करून शेवटी भगवंतालाच अर्पण करावयाचा म्हणजे त्यायोगेच मुक्ती मिळते हेच संत कबीरदास आपणास शिकवीत नाहीत काय?

आता गोरा कुंभाराचेच उदाहरण घ्या ना ! तो कोठे आपला गाडगी मडकी करण्याचा कुंभारपणाचा धंदा सोडून फक्त विठ्ठल भक्ती करीत राहिला ! कारण त्याला ठाऊक होते की आपण जर हा व्यवसाय सोडला तर जनताजनर्दनाची भांड्याची गरज कोण भागवील? आणि भांडी जर त्यांना मिळाली नाहीत तर ते पाणी कशातून आणतील व स्वयंपाक कशात करतील ! म्हणून जनतेच्या सेवेसाठी विठ्ठलाने आपल्याला ज्या घराण्यात जन्माला घातले त्या घराण्याचा कुंभारकी हा धंदा केलाच पाहिजे. तो न केल्यास आपल्या हातून कर्तव्य सोडण्याचे पाप घडेल व त्या पापाचे प्रायश्चित पण भोगावे लागेल. शिवाय पांडुरंग आपल्याला जवळ करणार नाही ही गोष्ट तर आणखी निराळी ? स्वे स्वे कर्मज्यभिरतः संसिद्धि लभते वरः।''ही गीतावचने गोरा कुंभाराने गीता न शिकवताच अमलात आणली होती. उद्योगालबद्दलचे केवढे हे प्रेम ! गोरा कुंभाराच्या उद्यमशीलतेचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे त्या उद्योगात स्वतःला हटवून बसण्याचे एकदा गोरा कुंभार भांडी करण्यासाठी पायांनी माती तुडवीत असता विठ्ठल भजनात व आपल्या कामात एवढा दंग झाली की घरातून रांगत आलेले स्वतःचे मूलही त्या मातील तुडविले गेलेले त्याच्या लक्षात आले नाही. पण भगवंत भक्तांची कर्माबद्दलची निष्ठा त्यातील कर्तव्यपरायणता यांची परीक्षाच घेतो व त्या परीक्षेत जे उतरले त्यांची सर्व काळजी तोच वहातो आणि म्हणूनच पांडुरंगाने गोरा कुंभाराचा पुत्र पुन्हा जिवंत केला. प्राप्त कर्तव्य कधीच न सोडता ते अगदी तल्लीनतेने, देहभान विसरून समर्पण भावनेने करण्याबद्दलचे गोरा कुंभाराचे केवढे हे तेजस्वी उदाहरण !

## ॥ संत नरहरी सोनार ॥

नरहरी सोनाराने आपला सोन्याचे दागिने बनविण्याचा धंदा सोडला तर नाहीच पण तो अगदी प्रामाणिकपणे विठ्ठलस्मरणात केला. चोख सोने घेऊन त्याने त्याचे डागी दागिने कधीच बनवून दिले नाहीत. दागिने केले ते अगदी चोख सोन्याचे. त्यात त्याने चोरी कधीच केली नाही. नरहरी सोनार म्हणतो, 'सोन्याचे दागिने बनवत असताना या हरिदासाने सोन्याचा व्यवहार कधीच केला नाही. केला तो नामाचा व्यवहार ! रामनामरूपी सोन्याची च्रोरी मात्र जरूर केली. पण सोन्याची चोरी कधीच केली नाही. रामनामाला सोने मानून त्यांत आपला व्यवसाय नरहरी सोनार अत्यंत प्रामाणिकपणे करत असल्यामुळे ते भगवंताचे आवडते भक्त बनले व ईश्वरचरणी विलीन झाले. आपला व्यवसाय सोडून किंवा तो केल्यास अप्रामाणिकपणे करून भगवंताच्या जवळपास सुद्धा जाता येत नाही हेच आपल्याला नरहरी सोनार शिकवून जात नाहीत काय?

## ॥ संत सेना ॥


हजामती करण्याचा धंदा तस म्हटलं तर बरेचसे लोक कमीपणाचा मानतात. कारण ''रिकामा न्हावी तुंबड्या भरी'' किंवा काम व्यवस्थित केले नाही की काय हजामती करीत होतास काय म्हणून त्या माणसाला आपण हिणावतो. परंतु नाभिक कुलात जन्मलेल्या सेना न्हाव्याने हजामती करण्याचा धंदा कधीच कनिष्ठ मानला नाही. उलट त्यामुळेच आपल्याला लोकांच्या डोक्यातील घाण काढून टाकण्याची विठ्ठलाने संधीच दिली असे त्यांने मानले. तो म्हणे 'आम्ही नापित नापित करू हजामती बारीक बारीक' त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही नापित, जनतेच्या डोक्यावरील नुसते केसच काढत नाही तर त्या केसांबरोबर त्यांच्या डोक्यातील सर्व घाणेरडे व अमंगल विचार पण काढून टाकतो आणि ते काढले गेले तरच त्यांच्या डोक्यात सुविचारांची, सत्कर्त्याची प्रतिष्ठापना होऊ शकेल आणि त्यामुळेच मग अशा मंडळींचा उद्धार होऊ शकेल. शिवाय आपण हे काम जर केले नाही तर उलटे कोणी हे काम करावयास तयार होणे शक्य नसल्यामुळे समाजाची गैरसोय होऊ नये व तशी ती केल्यास पांडुरंग आपल्याला क्षमा करणार नाही ही पण त्यामागे सेनाची भावना होती. ह्या हलक्या मानल्या गेलेल्या धंद्यातून सुद्धा आपण हजामतीबरोबरच लोकांच्या डोक्यात सद्विचारांचे आरोपण करतो व त्यामुळे त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग सापडतो ही कर्तव्य करण्यामागची केवढी उच्च व उदात्त विचारसरणी आहे. म्हणून कोणतेही कर्म कनिष्ठ न मानता त्याला देवरूपच करून टाकण्यास त्यात नराचा नारायण करण्याची शक्ती येते हेच संत सेना आपणास सांगत नाहीत का?

संत रोहिदास चांभार तर इतरांच्या दृष्टीने जोडे शिवण्याचे अगदी हलके काम करणारे. पण असले काम आपल्याला करावे लागते म्हणून त्यांनी कधी पांडुरंगाकडे तयार केली नाही. एवढेच नव्हे तर हे काम करून आपण जनतेची थोडीफार सेवा करू शकतो यातच धन्यता मानून ते काम विठ्ठलस्मरणात करण्यात दंग असत. पांडरंगाबद्दलचा त्यांची निष्ठा व भक्ती एवढी की ते जोडे शिवण्यास बसण्यापूर्वी खिशातील पांडुरंगाची तसबीर काढून तिला आंघोळ घालून ती पुसून बुक्का लावून पांडुरंगाला अगदी मनोभावे वंदन करून खिशात ठेवत. मग स्वतःच्या भाळप्रदेशी बुक्का लावून मगच कामाला सुरुवात

करीत असत. पांडुरंगाची तसबीर कामाच्या वेळी पण खिशात ठेवण्यामुळे आपण काम पांडुरंगचे करीत आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यामुळे त्या कामाबद्दलचा अहंकार त्यांच्या मनात मुळीच नव्हता. तसेच कर्तव्य केलेलेच विठ्ठलाला आवडते. व त्या कर्तव्याच्या द्वारेच आपल्याला आपले ध्येय गाठता येते अशी त्यांची धारणा होती. **''कर्तव्याने घडतो माणूस।'' ''कर्तव्याला मुकता माणूस, माणूस ना उरतो''** अशा उद्यमशीलतेच्या ध्येयवादाने ही संतमंडळी भारलेही असल्यामुळे कर्तव्यतत्परतेचा व कोणतेही काम कनिष्ठ न मानण्याचा आदर्शच त्यांनी समाजापुढे ठेवला नाही काय?

**शांतिब्रह्म नाथ**

अखंड निःस्सीम भक्तीने विठ्ठलाचा साक्षात्कार होतो हे एकनाथमहाराजांना ठाऊक होते. पण तरी सुद्धा त्यांनी गृहस्थाश्रम न सोडता त्यातील कर्तव्य अगदी यथासंग पार



पाडून ''धन्यो गृहस्थाश्रम'' हे वचन सार्थ करून दाखविले. संसारी माणूसही भगवंत प्राप्ती करून घेऊ शकतो याचे नाथ हे अगदी बोलके उदाहरण होते. देवपूजा ब्राह्मणभोजन, कीर्तन, प्रवचन, गरीबांना अन्नदान या गृहस्थाश्रमात करावयाच्या गोष्टी त्यांनी अगदी निष्ठेने केल्या आणि त्यामुळेच की काय माधव श्रीखंड्याच्या रुपाने नाथांच्या घरी पाणक्याचे काम व नाथांना पूजेसाठी गंध उगाळून देण्याचे काम करू लागला. भगवंताचे आवडते झाल्यानंतर भगवंत भक्तासाठी कसा राबतो ह्याचे हे मूर्तिमंत उदाहरणच नव्हे का! नाथ जरी संसारी होते तरी त्या संसारात ते कधीच गुंतून पडले नाहीत किंवा त्यांनी कशाची आसक्ती पण बाळगली नाही. सर्वांच्या ठिकाणी ते भगवंतच पहात असल्यामुळे त्यांनी लोकापवाद झुगारून देऊन अत्यंजांना श्राद्धाचे भोजन घातले अनाथ हरिजन बालकाला कडेवर उचलून घेतले व वाळवंटात तहानेने व्याकूळ झालेल्या गाढवाला कावडीतले गंगाजळ पण पाजले. प्राण्यांमध्येसुद्धा भगवंत पहाण्याची नाथाची केवढी ही मनाची विशालता, प्रगल्भता व असामान्यता! स्वतःच्या उद्धाराबरोबरच सामान्य माणूस सुद्धा भगवंत प्राप्ती करून घेऊ शकतो यासाठी त्यांनी नाथ भागवत अनेक भारूडे वगैरे ग्रंथ सोप्या भाषेत लिहून धर्माबद्दलच्या जनतेच्या विकृत कल्पनांवर प्रहार करून धर्मपालनासाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याबद्दल अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन समाजाला केले. जीवनात परमार्थप्राप्तीसाठी संसार सोडण्याची मुळीच जरून नाही व आपला प्रपंचच जर आपण परमार्थरूप केला व तर वेगळा परमार्थ करण्याचं पण जरूर नाही हे जनता जनार्दनास स्वतःच्या उदाहरणावरून पटवून दिले. प्रपंच न सोडू शकणाऱ्या सामान्य माणसांना नाथमहाराजांचा केवढा हा दिलासा! जीवनात शांती ढळण्याचे अनेक प्रसंग नाथांच्या जीवनात आले असताना सुद्धा त्यांनी आपली शांती अजिबात ढळू दिला नाही हे नाथांचे आणखी एक वैशिष्ट्य! म्हणूनच त्यांना जनतेने शांतिब्रह्म ही पदवी बहाल केली. शुल्लक कारणावरून आपला मूड लगेच घालवून बसणाऱ्या संसारी तरुणांनी नाथांच्या या सद्गुणाचे अनुकरण केल्यास त्यांना संसारात सुख शांति समाधानासाठी आणखी काही वेगळे करावयास नकोच.

**॥ संत सावता माळी ॥**

सावतामाळी तर आपला मळा स्वतःचा न मानता तो विठ्ठलाचा मानून त्यात भक्तिभावाने काम करून तो पिकवीत असे. आपण जर मळ्यात मनापासून काम करून तो जर चांगला पिकवला नाही तर पांडुरंगाची आज्ञा मोडण्याचे पाप पदरी घ्यावे लागेल अशी सावतोबाची धारणा होती. मळा पिकवताना सावतोबाने दाखविलेली निःस्सामी उद्योगभक्ती पांडुरंगाला पण भावली व ''कांदा मुळा भाजी झाली अवघीच पंढरी'' असे मानणाऱ्या सावतोबाला पांडुरंगाला मळ्यात येऊन दर्शन द्यावे लागले. उद्यमशीलतेचे यापेक्षा आणखी भरघोस फळ ते कोणते? आषाढी एकादशीस दरवर्षी पंढरपूरला जाणारे वारकरी सावतोबाच्या मळ्यावरून जात असता, एकदा सावतोबाला वाटले की वारकऱ्यांबरोबर आपल्या मळ्यातील थोडी भाजी पांडुरंगाला द्यावी. म्हणून त्याने वारकऱ्यांना त्याबाबत विनंती केली. पण प्रत्येकाने त्याला

''आम्हाला काय म्हणून तू हे काम सांगतोस? तुला जर एवढं विठ्ठलाच प्रेम आहे तर तूच का नाही स्वतः भाजी घेऊन जात पंढरीला? आम्ही काय तुझे भाजीचे ओझे न्यावयाचे?'' अशी ही उत्तरे ऐकल्यावर सावता खिन्न होत असे. तो पांडुरंगाला म्हणे '' हे वारकरी माझी भाजीं तुझ्यासाठी नेत नाहीत म्हणून पांडुरंगा मी सुद्धा स्वतः ती घेऊन आलो असतो रे ! पण मग तू मला दिलेलं मळा पिकविण्याचं काम सोडून मी कसा काय येऊ रे !'' असे म्हणून तो पुनश्च आपल्या मळा पिकविण्याचा कामात दंग होत असे. आणखी एक दोन दिवसानंतर सावताने अगदी काकुळतीला येऊन एका वारकऱ्यास पांडुरंगासाठी भाजी नेण्याबाबत विनंती केली. पण त्या वारकऱ्याने पण दाद दिली नाही. त्यावेळी सोवतोबाने त्या वारकऱ्याला जे उत्तर दिले ते काम टाळणाऱ्या मंडळींनी अगदी अंतःकरणात कोरून ठेवण्यासारखे आहे. सावता त्या वारकऱ्याला म्हणाला, ''तुम्ही म्हणता ते अगदी बरोबर आहे. मीच स्वतः भाजी घेऊन ती विठ्ठलाला देण्यासाठी आलो असतो व पांडुरंगाचे डोळे भरून दर्शन पण घेऊ शकलो असतो. पण मी का येत नाही ते सांगू का? अहो भाजी देण्यासाठी म्हणून मी जर विठ्ठलासमोर उभा राहिलो तर मळा पिकवण्याचे तुला दिलेले काम सोडून तू इकडे का आलास असे तो मला विचारील अशी मला भीती वाटते.'' उठसूठ काही कारण नसताना सुद्धा कामाच्या खुर्च्या सोडून इतरत्र भटकत राहून काम टाळणाऱ्या मंडळींच्या डोळ्यात सावताने केवढे हे झणझणीत अंजन घातले आहे ! बिनाकारण खुर्ची का सोडतील हे भगवंत आपल्याला विचारील ही जाणीव ठेवून सावता माळ्याप्रमाणे सर्वांनी आपल्याला कामात वाहून घेतल्यास कामाचे ढीग कशाला साठतील.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**

समर्थ रामदास तर उद्यमशीलता व कृतीयुक्त भक्ती यांचा सुरेख संगमच. देशाटन करताना समर्थांच्या असे लक्षात आले की मुसलमान हिंदूवर आक्रमण करून त्यांची लुटालूट करून प्रदेश बळकावत आहेत. हिंदूची देवालये उद्ध्वस्त करीत आहेत व त्यांच्या बायकापोरींची अब्रू पण घेत आहेत. तरीसुद्धा हिंदू समाज निष्क्रिय, नेभळटपणे आपले स्वत्व गमावून बसल्याप्रमाणे ते सर्व पहात आहे व निमुटपणे सहन करत आहे. एवढेच नव्हे तर तो प्रारब्धावर विश्वास ठेवून दैववादी बनून आळशी बनत चालला आहे. हे समाजचित्र पाहून समर्थ अतिशय व्यथित झाले व या समाजपुरुषाचे पौरुष व अस्मिता जागी करून त्याला अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी कार्यप्रवण करण्याची आत्यंतिक जरूरी आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी तीर्थाटणे करून समाजाला संघटित केले. अनेक ठिकाणी मारुतीच्या मंदिरांची स्थापना करून लोकांना बलसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. शिवाय प्रारब्धावर



विसंबून रहाणे म्हणजे प्रयत्न करण्याचे सोडून पलायनवादाचा व पर्यायाने भ्याडपणाचाच अवलंब करण्यासारखे आहे. भेकड व सत्त्वहीन माणसाला जीवनात काही स्थान नसल्यामुळे त्याचा जन्मच निरर्थक होय हे त्यांनी समाजाला समजावून सांगितले समर्थ व सार्थ जीवन जगण्यासाठी प्रत्येकाने प्रारब्धावर विसंबून न रहाता उद्योगाची कास धरून प्रयत्न हा देव मानून दमेपर्यंत परिश्रम करणे कसे जरूर आहे हे त्यांनी दासबोध, आत्माराम, करुणाष्टके, विराण्या स्तोत्रे, आरत्या वगैरे त्यांच्या ग्रंथसंपदेतून प्रतिपादन केले. कर्म न सांडता भगवद्भक्ती कशी करता येते व त्यातूनच मोक्षप्राप्ती पण प्राप्त करून घेणे कसे शक्य आहे हे समर्थांनी स्वतःच्या आचरणातूनच जनतेपुढे ठेवले. कर्म करता करताच आध्यात्मिक उंची कशी गाठावी पण त्यासाठी आधी मन तयार करणे कसे आवश्यक आहे हे पण त्यांनी मनाच्या २०५ श्लोकातून जनतेपुढे मांडले. मानवी मन निरोगी, पोलादी व चांगले धष्टपुट करण्यासाठी त्यांचे मनाचे २०५ श्लोक म्हणजे मनाला द्यावयाची २०५ इंजेक्शनच नव्हेत का? पण थोडक्यात सांगावयाचे झाल्यास वरील संत महात्म्यांनी आपल्या वाट्यास आलेले विहित कर्तव्य मुळीच न सोडता ते कधीच कनिष्ठ न मानता, ते अगदी श्रद्धेने, प्रामाणिकपणाने निरहंकारबुद्धीने फळाची आशा न ठेवता भगवत स्मरणाने ज्याप्रमाणे जीवनसिद्धी प्राप्त करून घेतली त्याप्रमाणेच आपण सामान्यजन पण करून घेऊ शकणार नाही काय?

❑❑❑

# ‘स्वरुप’ साधना

– कृष्णा तेली, कुडाळ.

— ❖ ❖ ❖ —

**रत्नागिरी जवळील पावस हे स्वामी स्वरुपानंदाच्या वास्तव्याने व समाधीमंदिराने पावन जालेले क्षेत्र आहे. स्वामींनी संत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी अभंग रुपात लिहिली. स्वामीची ‘‘अभंग ज्ञानेश्वरी’ भाविकांमध्ये अत्यंत प्रिय असून स्वामींच्या भक्तीचे व स्वामींच्या अध्यात्मिक प्रतीतीचे ती एक दर्शन आहे.**

— ❖ ❖ ❖ —



श्री स्वामी स्वरुपानंद या विभूतीचा परिचय करण्याचे तसे कोणतेच कारण नाही. त्यांच्या सान्निध्यात वावरलेले त्यांचे सत्‌शिष्य व भक्तजन या परिसरता आढळतात. त्यांचे जीवनचरित्र जवळून पाहाणारे देसाईबंधू, आजही त्यांच्या आठवणी सांगतात. स्वामींचे वास्तव्य आजही पावसला आहे याची प्रचिती माझ्यासारख्या सामान्य पामराला येते तर त्यांचे सान्निध्य लाभलेले हे भाग्यवान होत त्यांचा आनंद अवर्णनीय आहे.

त्यांच्या जीवनकार्यातील ‘श्रीमंत संजीवनी’ गाथेतील अभंग साधक-मुमूक्षु ना मार्गदर्शक तर आहेतच परंतु नित्योपासनेमध्ये श्रवणनीय आहेत. त्यांचे अभंग भीमसेने जोशींच्या गळ्यातून ऐकण्याचे भाग्य ही मला लाभले तो क्षण मी कसा विसरू? स्वामींचा जन्मोत्सव (१५ डिसंबेर) रोजी असतो.

श्री स्वामींकडे कित्येक पारमार्थिक मार्गदर्शनार्थ येत असत. त्यांना या संजीवनी गाथेतील अभंगरुपाने मार्गदर्शन होत असे या पार्श्वभूमीवर या अभंगांचा खोलवर अभ्यास करणे अत्यंत जरूर आहे. सत्कर्म, नितीविचार, ईश्वरभक्ती, आत्मज्ञान यांचा सरळ-सोपा अर्थ कमी शब्दात मांडण्याचे श्री स्वामींचे कौशल्य वादातीत आहे. त्यांच्या साधनेचा परमोच्च बिंदू त्यांच्या या

अभंगात पदोपदी जाणवतो.

आता आपण स्वामींच्या अभंगातील अनुभवसंपन्न विचार-साधना-भक्ती-आत्मा-ज्ञान-उपदेश-श्रीगुरु यांच्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करू या. जीवनाच्या प्रत्येक अंगास स्पर्श करून गेलेले त्यांचे विचार मार्गदर्शक तर आहेतच परंतु नित्य निरंतर ताजेही आहेत.

**अनुभवसंपन्नता :**

अनुभवक्षेत्रास पारमार्थिक जीवनात नंबर एकचे महत्त्व संतश्रेष्ठ देतात. हे शास्त्र अनुभवण्याचे आहे त्याच्यात रोकडा आत्मसाक्षात्कार घडवून आणला जातो. स्वामी म्हणतात- **गोडी कळावया द्यावा गूळ खाया। देव ओळखाया अनुभव ॥** किंवा **स्वामी म्हणे नाही पांडीत्यांचे काम । स्वये आत्मराम दाखवावा ॥** ज्यांना कृत्रिमपणात गोडी वाटते त्याचेबद्दल श्री स्वामी आपली नाराजी व्यक्त करतात. मनुष्याला स्वाभाविकतेची आवड वाटावी जेणेकरून कुत्रिमपणा गळून पडेल व स्व स्वरुप (अकृत्रिम) आपले आपणास अनुभवास येईल. खऱ्या अनुभव संपन्न भक्ताला वासुदेव येथे-तेथे सर्वत्र भरून राहिल्याचा अनुभव येईल. हीच स्वामीची अद्वेत भक्ती.

**स्वामी म्हणे होता स्वरुपी तद्‌रुप ।**
**लोपे आपोआप द्वैताभास ॥**

सोह जप आपोआप होतो व त्या सुखाची या जगी कोणालाही किंमत करता येणार नाही असा अनुभव त्यांच्या जीवनात त्यांनी अनुभवला. अर्थात हे सुख प्राप्तीसाठी स्वामी म्हणतात-

**स्वामी म्हणे खूण घ्यावी ओळखून ।**
**संताशी शरण जावोनिया**

**स्वामी म्हणणे मग स्वानंदाचा भोग ।**
**होय तोही सांग सुखरुप ।**

आत्मरुपी सोय झाली की अनुभवाची परिसीमा होते

**स्वामी म्हणे आम्ही न पडो संदेही ।**
**देही ची विदेही आत्मरुप ।**

हा अनुभव बोलून दाखवण्याचा एक प्रघात असेल परंतु तो बोलून दाखवला तर त्याची महती काय कमी होणार नाही. आपली विदेही अवस्था झाली ही सांगण्याचीही आपली स्थिती राहाता नये. ''आम्ही झालो म्हणे तेची तया न्यून । मौन ही ची खूण स्वामी म्हणे ॥ असे ते म्हणतात. स्वामी म्हणणे झालो मीची चराचर । नांदतो साचार एकलाची या चराचरातील आत्मतत्त्वाचा मी एक अंश या सृष्टीत नांदतो आहे त्या पलिकडे मी नावाचा कोणी शिल्लक राहात नाही.

सामान्य लोक आपला स्वतःचाच विचार कधी करीत नाहीत त्यामुळे फक्त दुःख भोगणे यासाठीच ते या पृथ्वीवर येतात की काय ही प्रकर्षाने खंत श्री स्वामींना वाटते. 'घडी घडी काळ भक्षीतो आयुष्य । परि ह्याचे लक्ष प्रपंचानी' हा अनुभव स्वामींनी किती यर्थाथपणे थोडक्यात मांडला पहा. जेथे काम, क्रोध, लोभ आहेत तेथे पुष्टी, शांती, कशी असेल?

प्रथम देहाची आसक्ती बाळगून या संसारात आपण उतरतो ती संपता संपत नाही व आत्म्याचा शोध काही लागत नाही अशी अवस्था होऊन राहीली आहे. आत्मज्ञान होत नाही आत्मज्ञान झाले तर अवीट अखंड शांती सुख आपल्या हाती येईल. त्यासाठी मात्र साधना हवी. त्यासाठी अनुभवसंपन्न आत्मज्ञानी संतच आपल्याला तारतील स्वामी म्हणे रंगे नित्य संत संगे । घेऊन निजंगे यांनी रुप । सर्व पाश तोडावे असे वाटले तर फक्त आतून तयारी हवी - **लौकीकाचा पांग फेडीला सहजे । सांडोनिया ओझे अहंतेचे ।** अहंता सोडली की मी कोण याच्या जवळ आपण येतो. अनुभवाचा शेवटचा टप्पा गाठताना आपण विदेही होऊं

**जन्म मरणाची संपली ते वार्ता ।**
**दूर ठेवी चिंता संसाराची ।**
**कैचा आत्मा कैचा देह ।**
**माझा मीची निःसंदेह ।**
**गिळोनीया मी तूपण ।**
**स्वामी झाला सचिद्‌घन ।**
**अवघी संपली उपाधी ।**
**नित्य निवात निर्भय ।**
**स्वामी झाला राममय ।**

यावरून श्री स्वामीची विदेही अवस्था ही उपाधीरहीत मी-तू पापापासून अलिप्त, निःसंदेह आत्म्य बलीकडेही 'पर-ब्रह्मी' स्थिती होती हे अभ्यासू साधकाला समजेल. साधनेतील ही शेवटची उच्च स्थिती अनुभवातूनच श्री स्वामी सचिदघन आत्मस्वरुपी सोहं ध्यानातून अलिप्तपणे आत्मसुख भोगित होते. फक्त शरीराने ते आपल्यात दिसताहेत पण त्यांची सूक्ष्म अवस्था केव्हा अनंतात विलीन झालेली होती. त्यांच्या साधनेचे ही मूर्त स्वरुप आपण अनुभवण्याचा थोडासा प्रयत्न करू या.

**साधना**

परमार्थात साधनेला किती महत्त्व आहे हे परमार्थीला

सांगण्याचे कारण काही. श्री स्वामींनी जी साधना अनुसरली ती अद्वैत साधना. 'सोहं' भावातून स्वरुपाला गवसणीघालणारी होती. स्वरुप चिंतन हेच त्यांचे अंतीम ध्येय पुढे साकारले व ते 'स्वरुपमय' झाले. साधक व्यक्तीने पूर्ण तयारी कशी करावी तेथून साधना पूर्णत्वास जाऊन त्यांची अंतिम स्थितीही स्वानुभवावरून श्री स्वामींनी विषद केली आहे. साधनेची सुरुवात करताना एक सोपी परंतु महत्त्वाची गोष्ट की,

**चित्त असो द्यावे निवांत प्रसन्न ।**
**कल्पांतीही खिन्न होऊ नये ॥**

**स्वामी म्हणे व्हावा ईश्वरी विश्वास ।**
**संताचा सहवास सोडू नये ॥**

**अंतरी असावा अखंड उल्हास ।**
**आपत्तीचा त्रास मानू नये ॥**

**दक्ष राहावे संसारी ।**
**सद्भावे लक्षोनी हरीपाय ॥**

यावरुन साधकाची मनोभूमिका कशी तयार व्हावी ही स्पष्ट खूण श्री स्वामींनी सांगितली आहे हे स्पष्टच होते.

आता जर साधक प्रसन्न, आनंदी, आप्तची त्रास न मानणारा व हरीनामी सतत लक्ष ठेवणारा असेल तर त्याची पुढे कोणती अवस्था त्याला प्राप्त होते ते पहाणे तितकेच आनंददायी आहे. साधक स्वरुपी लल्लीन होतो त्याला या विश्वात भेद असा आढळतच नाही. कारण ते आत्मरुप त्याच्यात व चराचर सृष्टीत एकपणाने नटलेले तो अनुभवतो. सगुण व निर्गुण हा वृथा वाद आहे हे समजल्यामुळे व स्वानुभवाची खूण प्रत्यक्षपणे अनुभवल्यामुळे त्याचे मन एकाच स्फूरणरुप स्वरुपाकडे लागून राहाते. साधनी माणसाने प्रपंचात सारासार विवेक केल्यामुळे तो गुंतून न जाता अखंड सावधानपणे आपले साधन सांभाळतो. मग त्याला लौकीकाचा भास वाटतो पण एकांत प्रिय वाटतो. साधनेत एकांतप्रिय वाटला की सत्त्वगुण प्रकर्षाने प्रगट झाले असे समजावे व कर्माची सतत प्रवृत्ती वाढली तर रजोगुण व तसेच अज्ञानाचा जोर होऊ लागला, आळस वाढू लागला तर तमोगुणाने आपल्यावर विजय मिळविला आहे असे निश्चित समजावे असे श्री स्वामी म्हणतात. फक्त सिद्धी प्राप्त करणे साधनेचे अंतीम ध्येय नाही त्या साधकाला प्राप्त होतात त्या साधनेच्या यशस्वी खुणा समजाव्यात म्हणुन-पण 'आत्मस्थिती अखंडीत'' राहणे हेच परमार्थाचे अंतीम फळ जाणावे.

ही आत्मस्थिती अखंडीत राहण्यासाठीचे उपाय सोपे. परंतु तितकेंच बहुगुणी आहेत ते (श्री स्वामी) म्हणतात-

**करावा विचार आपुला आपण ।**
**कोण मी कोठून जन्मा आलो ।**

**देहांती मागुते कोठे जाणे असे ।**
**काय विश्व कैसे होय जाय ।**

याची उत्तरे सतत अभ्यासावीत म्हणून...

**स्वामी म्हणे यत्ने ऐसा शोध घेता ।**
**होतसे प्रबोध अंतर्यामी ।**

**स्वामी म्हणे व्हावे नित्य समाधान ।**
**तरी करी ध्यान स्व-रुपाचे ।**

संयमी जीवन, स्वरुपी सदा दक्ष, गुरुकृपेचा वर्षाव, मनाला युक्ती प्रयुक्तीने गोंजारणे, मग मनालाही मागे टाकण्याचा सराव, सारासार विचार, चित्तशुद्धी, देहाला उदासीन राहाणे, विश्व मायिक आहे हे ठामपणे जाणणे, प्रयत्नाते कामक्रोध लोभ आवरणे - हरीभक्ती-शरणागती व नामाची महती जाणणे-शब्दाशिवाय सोहं ध्वनी जाणणे, जाणीव नेणीव पलीकडे अलक्षाकडे लक्ष केंद्रीत होणे या टप्प्यातून स्वामींनी 'स्वरुप' कसे गाठले हे अंतीम सत्य प्रकर्षाने मांडले आहे. वैराग्याची खूण सांगताना ते म्हणतात -

**स्वामी म्हणे देही न जावे गुंतून ।**
**हीची असे खूण वैराग्याची ।**

साधनेत अखंडपणे संतांचे पूजन करावे व त्या दयाघन ईश्वराचे ध्यान धरावे म्हणजे परमार्थाची सांगता होते. एकांतात बसून सोहं ध्यान धरून मनाची स्थिरता साधावी. यामुळे देहाचा अहंकार क्षीण होत जाऊन स्वरुप साक्षात्कार होईल. सतत परब्रह्मी एकरुप साधकाला अहंकार कसा राहील? हेच अभेद भजन निरंतर समाधान प्राप्त करून देते. स्वामींचे सद्गुरु यांनी 'नाभी' असा नाभिकारी मंत्र दिला. येथे स्वामींनी अर्थाचे दोन प्रकार मांडले आहेत. 'ना भी' (नको भिऊस !) व नाभी म्हणजे परवाणीचे स्थान जेथे मी व तू हा भेदच नाही तेथे भय कसे राहील? हा भवपार पार कसा करेन हा क्षणोक्षणी विचार करू लागल्यावर श्री सद्गुरु त्या साधकाला मार्गदर्शन करून हा भवपार लिलया पार पाडतात. एकदा स्वरुपाची गोडी आपणास लागली (स्वरुपसंधान) की तेथे आनंदाला क्षय नाहीच. संसार व्यवहार हे तो न करता त्याचेकडून घडून लागतील तो 'सारासार' विचाराने हे विश्व पार करून केव्हाच देहातीत बनला आहे. स्वहिताचे साधन एकदा दृढ झाले की 'आत्म हीत' प्रगटते. हे अनुसंधान जमले की, कर्तृत्वाचा भार न राहाता सर्व कर्मे आसक्तीरहीत बनतात ही अलिप्तता साधली

की, अनुसंधानातच निमग्न राहाता येते. सोहं ध्यान निरंतर जागे ठेवणे हेच एक साधन त्याला करावेसे वाटते. साधकाने सद्गुरुपायी दृढ श्रद्धा ठेऊन त्यांचे पायी लीन होताच त्याची साधना फळाला येते. सर्व अज्ञानाचा नाश होऊन जन्म, मरण, संसार तुटून पडतात. आत्मसुखाची अवीट गोडी सद्गुरुनी एकदा साधकाला दिली की त्यापुढे हे मायेचे विश्व टिकतच नाही. हीच 'उन्मनी' अवस्था जाणावी. स्वानंदाचे निधान हाती लाभलं की जन्माचे सार्थक होते व सगळी धडपड शांत होते. स्वामींच्या स्वरुप साधनेची ही गुरुकिल्ली साधकाने अभ्यासावी व आत्मसात करावी ही त्यांची प्रार्थना आहे.

**भक्ती :**

भक्तीचा महिमा वर्णन करताना श्री स्वामी म्हणतात -

**स्वामी म्हणे स्थिर हरिपद एक।**
**तेथे ची निःशंक राहे सदा।**
**प्रेमे हरीसवे बोलावे डोलावे।**
**अखंड भेटावे स्वामी म्हणे।**

मनाला कृष्णार्पणी वाहूनच संसारातील निष्कर्मे उरकावीत असे श्री स्वामी सांगतात. आपल्या भावबळाने देव आपलासा करावा तो कृपाळूपणे आपणास सांभाळेल. व्रत, तीर्थाटने, साधनेची इतर देहाला क्लेशकारी देहदंडाची कर्मे देवप्राप्तीसाठी न करता फक्त नाम स्वरुपी स्थिर राहावे, तीच आपली साधना खरी. इतर सर्व शीण होय. देवाला शरण जाऊन त्याची करुणा भाकावी व नामसंकीर्तनी तल्लीन राहावे चित्त शुद्धीचा उपाय। सदा चिंतावे हरीपाय।

देवप्राप्तीचा सर्वात सोपा मार्ग 'चित्त शुद्धी' मनात चांगले विचार प्रसवणे, सदा आनंदी उत्साही, परोपकारी राहाणे हेच चित्तशुद्धीची बाहेरची लक्षणे समजावीत. श्री स्वामीना तर प्रत्यक्ष चक्रपाणी दर्शन देत.

**शंखचक्र गदा पद्म करी शोभे।**
**सन्मुख हे उभे स्वामी म्हणे॥**

हा स्वामींचा भक्तीचा महिमा. भक्तीसुखापुढे मोक्ष-सुखही त्यांनी लाथाडले.

देहाची आसक्ती मावळली की भक्तीचा उदय झालाच म्हणावे. पूर्णपणे 'भाव' त्याच्यापाशी राहाणे हे अभेद भक्तीचे लक्षण आहे. भक्ती मार्गात सगुण-निर्गुण हा वाद संपुष्टात येतो. तेथे अभेदपणे एकच आत्मतत्त्व प्रचितीस येते. त्या वासुदेवाशिवाय काहीच दिसत नाही. या भक्तीपायी चारही मुक्ती दासी होतात.

**स्वामी म्हणे लावू सार्थकी जीवन।**
**हरीसी शरण जावोनिया।**
**स्वामी म्हणे देव भाविका माऊली।**
**कृपेची साऊली करितसे।**

आता अहं - सोहं भाव संपून भान आता नारायण रुपच झाले. अनुताप, चित्त शुद्धी, आत्मनिष्ठ बुद्धी, यामुळे प्रपंचाचे बंड मोडेल व अंती श्रीपती भेट देईल हे स्वामींचे आश्वासन आहे. सायुज्यमुक्ती लाभलेला देव होऊन स्वतः देवपूजा करतो अशी ही भक्तीची खूण स्वामी सांगून भक्त हाच ईश्वराचा प्राण असे वचन देतात. काम, क्रोध, दंभ, मोह, मान, हे सर्व त्यागून जे नाम घेतील तेथे श्रीपती हजर आहेच असे समजावे.

**भेटना गोविंद भक्तीविण।**
**मज तृणवत गमे सर्व प्राकृत।**
**आहे आत्मदित तुजपायी।**

**काय वर्णू तुझे नाम रुप गुण।**
**सगुण निर्गुण तुझी एक।**

**जेथे जेथे माझे हिंडेल हे मन।**
**तुझेची दर्शन तेथे होवो।**

**वाहो माझे मन तुझाची संकल्प।**
**तेणे आपोआप स्थिरावेल।**

ही तयारी झाली की भक्तीचे वर्म कळेल.

**स्वामी म्हणे मज तुझ कृपाबळ।**
**म्हणोनिया हा खेळ खेळतसे।**

भक्तपणाची सर्व स्थित्यंतरे श्री स्वामीनी सांगून ठेवल्यामुळे भक्ताचे ठायी कोणते भाव उदयास येताता हे स्वतः स्वच्छपणे तपासून भक्तीमार्ग अनुसरावा.

**आत्मा :**

या जगाचा खरा कर्ता आत्माराम होय. तोच खरा देव. त्याचे अनुसंधान टीकले की सर्व सुखे प्राप्त झाली म्हणून समजावे. या जगात एकरुपपणे विनटलेली शुद्ध जाणीव तो आत्मा समजावा. या जाणीवेतून सर्व घडामोडी घडतात. आत्म्याच्या आश्रयानेच ही सर्व सृष्टी चराचर दिसते. तो प्रत्येकात अनेकपणे कार्य करतो व एकपणाने भरून राहीला आहे. त्याचे अनुसंधान का ठेवावे, कसे ठेवावे. त्याची ओळखण्याची खूप कोणती वगैरे शंका दूर करून आत्मरूपी ते कसे शांत होते हे सांगितले आहे.

**जळात कमळ तैसा उपाधीत।**
**राहतो अलिप्त स्वामी म्हणे।**

आपल्या देहात हा आत्मा वास करतो. परंतु तो उपाधीत नसतो देहाचे क्लेश मात्र त्याला भोगणे प्राप्त ठरते असे असूनही तो शेवटी अलिप्तच राहतो, देह सोडून तो जातो. आत्मस्थितीत राहाणारे ते संत होय.

**एक आत्मरुप सर्वत्र संचले ।**
**नाही त्यावेगळे दुजे काही ।**

आत्मतत्त्वाशिवाय या जगात आणखी दुसरे काही नाही हे ओळखता आले की आत्मज्ञान प्राप्त झाले म्हणावे.

**माझे मजपाशी सापडले धन ।**
**आनंदले मन आत्मरंगी ।**

हे धन दुसरे काही नसून 'आत्मा' हेच धन आहे. ।

**विषयांचे सुख नाशीवंत देख ।**
**अविनाशी एक आत्मरूप ।**

आत्म्यामुळे देहाचे महत्त्व ते काय?

**घेवो हाती लाभ पावो सुख दुःख ।**
**न सोडी विवेक साक्षीत्त्वाचा ।**

आत्मा साक्षीपणाने देहाचे सर्व व्यवहार करतो तो कर्म करूनही अलिप्त राहातो.

**एकची तत्त्वता आत्मरुप सत्ता ।**
**मग भिन्नता उरे कोठे? ॥**

आत्मसत्तेशिवाय या चराचरात आणखी कोणी नाही.

**नको देह दंड नको व्रत नेम ।**
**पाहे आत्माराम अंतर्यामी ।**

जगाचा नियंता आत्माच आहे हे पटले की खरा

देव कोण? त्याची ओळख होते व त्याची भेट होते.

देवाचे देऊळ हाच देह व त्यात सर्व चंचळाचा मुकुटमणी हा आत्माच समजावा.

### ज्ञान :

ज्ञान कशाचे व्हावे म्हणजे हे भावबंध तुटतील याचे यथार्थ वर्णन स्वामीनी केलेले आढळेल. अज्ञानाचे ज्ञान होऊन ते दूर करावे अज्ञानाचे निरसन होण्यासाठी ज्ञानाचाच आधार घ्यावा लागतो. साधनेतील खुणा कोणत्या व सावधानता कोठे बाळगावी याचे सुंदर मार्गदर्शन श्री स्वामीनी कले आहे.

**सत्य एक आत्म नित्य निर्वीकार ।**
**जाणा चराचर मायाभास ।**
**विश्व आणी आत्मा एकची अभिन्न ।**
**जाणा हीची खूण स्वामी म्हणे ।**

हे ज्ञान होण्यासाठीच साधना करावी लागते.

सद्‌वस्तुचे ज्ञान होणे हेच परमसौख्य.

**सत्य एक आत्मा नित्य निर्वीकार ।**
**जपा चराचर मायाभास ।**

**दिसे ते लोचना भासे जे जे मना ।**
**ते ते मिथ्य जाणा मायारुप ।**

**सगुण निर्गुण हरीरुप जाण ।**
**एकची परिपूर्ण स्वामी म्हणे ।**

जग मिथ्या आहे हे मनापासून पटले पाहिजे तरच खरे हरीरुप सगुण व निर्गुणापलिकडे आहे ते परब्रह्म या शब्दात व कल्पनेत सामावून घेत नाही हे दाखवून दिले. देह तर आपला नव्हेच ते एक साधन आहे.

**राहे कोठे कैसा देहाचा संबंध ।**
**होता आत्मबोध अंतर्यामी ।**

**मिथ्या माया जाण ।**
**मिथ्या नाम रुप ।**
**एकला स्वरुपे हरी नांदे ।**

परब्रह्माचे वर्णन करताना त्यानी (श्री स्वामीनी) ज्ञानापलिकडेही झेप घेतली आहे.

तेच सद्‌वस्तू अव्यक्त, अनंत, अनादी, अचल, अच्युत, अद्वितीय, निष्क्रीय, अविकार, अक्षय, अपार, निर्गुण, निर्वीशेष, सनातन, शुद्ध, स्वच्छंद, एवढे वर्णन करूनही ते वर्णन संपत नाही म्हणून ते म्हणतात -

**स्वामी म्हणे कैसे करावे वर्णन ।**
**स्विकारावे मौन हेची भले ॥**

स्वरुपज्ञानाचा स्वच्छ प्रकाश अंतरात पडली की सर्व उपाधि, विकल्प मावळतात. मग नाम, रुप, गुण हे नाशीवंत ठरतात व फक्त आत्मपदच शाश्वत याची प्रचिती येते. परंतु हे अद्वैत साधले तरी ज्ञानी भक्तपण सोडीत नाही.

**जाणीव नेणीव गळे द्वैतभाव ।**
**खेळे स्वयमेव परब्रह्म ।**

सावध होऊन साधकाने आत्मरुपी दक्ष राहावे.

आपण अनादी अनंत स्वस्वरुपी आहोत. चारही देहांचा

निरास केल्यावर हे सहजपणे आपण ओळखू शकू.

एकाच आत्मतत्त्वातून हे विश्व भासमय दिसते व ते पुन्हा तिथेच विलीन होते हा नित्याचा खेळ असून त्यात

**स्वामी म्हणे आदी अनादी अनंत।**
**सुख दुःखातीत स्वयंसिद्ध।**

येथे ज्ञान मावळून 'विज्ञान' प्राप्त होते. ही स्वरुपाची स्थिती समजावी. ही स्थिती ओळखण्यापेक्षा ती होऊन राहाणे असे सांगणे संयुक्तीक ठरेल.

**उपदेश :**

सामान्यजनाना संतांचे बोल ही वचने वाटतात ती स्वानुभवसिद्ध असल्यामुळे त्यात सामर्थ्य असते. त्या वचनांच्या आधारे सामान्य जीवना फार मोठा आधार वाटतो. प्रत्यक्ष प्रपंचात वावरताना पारमार्थिक साधना ही सुरू ठेवावी लागते त्यावेळी अनुसंधान न बिघडता जीवनाची सर्व सूत्रे कशी सांभाळावीत हा उपदेश साधुजन आपणाला करीत आले आहेत त्या वचनांचा आपण आता येथे अभ्यास करावयाचा आहे. या मार्गदर्शक वचनाचा आधार घेत घेत कित्येक मुमुक्षु साधक बनतील व कित्येक साधक सिद्ध बनूनही साधना करीत राहतील.

१. आपण ज्या शब्दात बोलतो त्याच शब्दात समोरून उत्तर मिळते म्हणून आपले बोलणे मृदु गोड ठेवावे.

२. आपल्या आजवरच्या जीवनातील सुखदुःखे आपणामुळेच भोगणे प्राप्त झाली आहेत त्याला कोणीही दुसरी शक्ती कारणीभूत नाही हे पक्के ध्यानात ठेवावे.

३. कामक्रोधादी विकार हरीचिंतनात आड येतात हे जाणावे त्याना अनुसंधानाने दूर पिटाळावे.

४. अहंकारी मनाला आवरावे तरच आत्मोद्धाराचे द्वार उघडेल.

५. वारंवार एकांतात साधना करावी.

६. सिद्धी प्राप्त झाली म्हणून लौकीकात मिरवू नये. आपला वेळ साधनेत व परमेश्वर चिंतनात घालवावा नाहीतर साधन साधनेतून खाली घसरेल.

७. चमत्कारापेक्षा आत्मसाक्षात्कार फार मोलाचा.

८. वाढत्या आधुनिक तंत्रांचा उपयोग जरूर घ्यावा परंतु जर आपल्या अंतरात 'सद्भाव' जागृत नसेल तर मानवता लोप पावेल.

९. संतांची सेवा/संगत धरावी म्हणजे विषयभोगवृत्ती पालटेल.

१०. आणिकांचे सुख देखता जो सुखी। होय धन्य लोक तोची संत॥

११. आणिकांचे दोष आणी न जो मनी। गुणाते वाखाणी तोची संत।

१२. शब्द पांडित्यात न अडकता अंतर्यामी काम चालले आहे त्याचा अभ्यास करावा.

१३. लौकिकाचा प्रसिद्धीचा अभिमान नसावा.

१४. दुःखी खिन्न अंतकरण बदलून सदा सर्वकाळी स्वच्छंद आनंदी राहावे. हा परमार्थाचा पाया आहे.

१५. अति खाणे टाळावे परंतु उपाशीही राहू नये. मिताहार असावा. तसेच मौनही धरू नये परंतु फार बोलणे शक्यतो टाळावे.

१६. मनाला सदा सर्व काळ प्रसन्न ठेवणे ही आध्यात्माची गुरुकिल्ली समजावी. मनच जीवाला बंधनात अडकते तसेच तेच मोक्षास कारण ठरते.

१७. शरीर हे देवाचे मंदिर आहे ते तरि नेटके सुदृढ ठेवणे. तसेच मन व बुद्धी शुद्ध ठेवणे हीच देवपूजा.

१८. प्रपंचात 'माझे माझे' न म्हणता कर्मे करावीत हाच संन्यास.

१९. विरक्ती व भक्तीनेच परमेश्वरप्राप्ती मिळते.

२०. भक्ती व श्रद्धाहीन जीवन व्यर्थ होते. जगात वावरताना फक्त सुखदुःखाचे मोजमाप करणे ही जीवन यशस्वी ठरण्याचे मोजमापे नाहीत.

२१. खरा निजस्वार्थ परमार्थ पदरात पाडून घेणे. मोक्षप्राप्तीने कामनेची तृप्ती घडली असे एकही उदाहरण नाही अर्थात आसक्ती अमर्याद असते तीच आसक्ती परमेश्वराकडे वळवावी.

२२. प्रंपचात सारासार विचार करायला वेळ मिळत नाही ही तक्रार खरी आहे का? विचार करावा.

२३. विवेकाने प्रंपचात उदास राहाणे शिकावे मग सुखदुःखाचे भय समूळ नष्ट होईल. घरघर, कुटुंब जरुर असावे पण त्याचा भार वाटणे योग्य नव्हे.

२४. मरण अटळ आहे हे पटले की सद्गुण अंगी येतात.

काळाची झडप पडण्यापूर्वी सावधान व्हावे व आत्महीत साधावे.

२५. जो देवाशी 'एकनिष्ठ' राहातो त्याला इतर वरिष्ठ काही करू शकत नाहीत.

२६. जे आपण जगाला देतो तेच घ्यावे लागते. मग जगाकडून चांगले हवे असेल तर जगाला प्रमे द्यावे.

या वचनावरून स्वामीचा मानवी जीवनाबद्दलचा किती सूक्ष्म अभ्यास होता हे प्रकर्शाने जाणवते. काय करावे व काय करू नये याचे उत्तम दिग्दर्शन श्री स्वामीनी येथे केले आहे हा उपदेश आत्मसात करतील ते निश्चित पूर्णत्वास पावतील.

## गुरु :

श्री गुरुंच्या मार्गदर्शनाखाली सत्‌शिष्य आपली अध्यात्मिक प्रगती यशस्वीपणे करतो असे सर्व ज्ञात आहेच. कोणाचे गुरुत्त्व पत्करल्याशिवाय शिष्याला प्रगती साधता येत नाही. उत्तम शिष्य मिळणे हे सद्‌गुरुलाही भूषणावह ठरते. ही गुरशिष्य परंपरा सर्वश्रुतच आहे. श्री स्वामींचे सद्‌गुरु श्री गणनाथ त्यांनीच श्री स्वामीना गुरुमंत्र दिला व ही परंपार नाथसंप्रदायातून आल्याचे श्री स्वामीनी आपल्या अभंगात स्पष्टच केली आहे. सद्‌गुरुबद्‌ल श्री स्वामी काय म्हणतात ते पाहूया -

**गुरुकृपेवीण आकळे ना खूण।**
**व्हावे सावधान स्वामी म्हणे ॥**

आपल्या जवळच असलेले पण आपणाला न दिसू शकलेले

आत्मसुख केवळ गुरुकृपेने मिळते. श्री गुरुचे पाय स्पर्शून सत्‌शिष्याला काळाचेही भय उरत नाही.

**कृपावंत थोर सद्‌गुरु उदार।**
**तेणे योगसार दिले मज।**

श्री गुरुनी भक्ताला निजसुख प्राप्त करून दिले. साधनेतील प्रगती श्री. गुरुचरणाशिवाय सफळ होत नाही हा स्वानुभव येथे मांडला गेला आहे. संताची भेट घडताच त्यांच्यापाशी गुजगोष्टी कराव्यात आपल्या शंका विचारून त्यांचे निरसन करून घ्यावे. त्याना मी कोण? कोठून आलो? कुठे जाणार? आत्मबुद्धी कशी वाढवावी हे प्रश्न विचारावे. खऱ्या देवाचा थेट रस्ता विचावा म्हणजे वाटेतील अडचणी श्री सद्‌गुरु निवारण करतात. संताचा सतत सहवास हीच परमावधी समजावी. संत हेच मूर्तीमंत 'परब्रह्म' हे निःसंशय समजावे.

**गुरु तोची देव ऐसा ठेवी भाव।**
**सद्‌गुरुगौरव काय वानू ॥**

श्री गुरु हीच ब्रह्मानंदस्वामी, तिच ज्ञानमूर्ती, तीच परम शांती त्याना शरण जाताच स्वरुपाची तात्काळ भेट होते. **स्वामी म्हणे वंदी सद्‌गुरुपाऊले।**

श्री गुरु हे वैराग्याचे ठाव, योग्याचे वैभव भक्तीचे जिव्हार, ज्ञानाचे भांडार, शांतीचे माहेर, चैतन्याचे प्राण, सुखाचे निधान व विश्रांतीचे परमस्थान आहेत. ते मूर्तीमंत परब्रह्मच व आनंदाची खाण आहेत यात शंकाच नको.

श्री गुरु हे सगुणही नाहीत व निर्गुणही नाहीत त्याचा महिमा वर्णन करता येत नाही हाच त्यांचा महिमा.

**देवाकडे काय मागावे**
**देसी जरी देई देरा मजप्रति।**
**संतांची संगती सर्वकाळ**

सद्‌गुरुचा सहवास परमेश्वर प्राप्तीपेक्षा मोठा आहे. साधनेत श्री सद्‌गुरुना शरण जाऊन त्याची करुणा भाकावी साधनेतील सर्व अडचणी श्री सद्‌गुरु स्वतः निवारतात. श्री गुरु देहरुपाने नसतात ते विदेही मुक्त असल्यामुळे परब्रह्मी निराकार होतात. स्वरुपाची मूर्ती हे सद्‌गुरु मी वंदीतो.

आत्तापर्यंत श्री स्वामींच्या जीवन धारणेतून त्यांच्या संजीवनी गाथेतील प्रमुख पारमार्थिक मुद्द्यावर हे विवेचन संत-सद्‌गुरुंच्या प्रेरणेने केले ते अभ्यासकांना निश्चीत मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

श्री स्वामीच्या या 'सप्तसूत्री' तून कोणत्याही वचनांवर आपण रोज अहर्निशपणे वाचन-श्रवण व चिंतन-मनन करू शकलो तर आपली जीवनपद्धती उच्च पातळीवर जाईलच. आपण एखादा अभंग वाचतो. तो आवडतो. पण अर्थात शिरण्यासाठी प्रयत्न केला तर तो पूर्णपणे मनात ठसतो. अभंगात सर्व साधनासूत्रे, परमार्थ, प्रार्थना, तत्त्वचिंतन भरलेल असते वर वर पाहता अभंग छोटा, फार कमी शब्दमय असतो परंतु ज्ञानाच्या अखंड ज्योती तेवत ठेवणारे श्री सद्‌गुरुचे ते प्रत्यक्ष दूतच असतात.

श्री स्वामींच्या अभंगप्रेमी भक्तांनी या अभंगातील एक-दोन सुंदर अभंग नित्य भजनात/वाचनात/मननात ठेवावे त्यामुळे चित्तवृत्ती प्रसन्न राहतीलच पण या प्रवासात श्री स्वामींचा हात आत्मोद्धारासाठी सदैव त्यांना प्राप्त होईल यात तिळमात्र शंका धरू नये.

□□□


# योगीयांचा राजा ज्ञानोबा माझा

– गजानन कुलकर्णी

— ❖ ❖ ❖ —

संत ज्ञानदेव हे मराठी माणसांची 'माय माऊली' होत. अवघा महाराष्ट्र त्यांना 'माऊली' म्हणतो. या शब्दातून व्यक्त होणारी जवळीकता ज्ञानदेवांचे एकूण समाजातील व्यापपण दर्शविते. अशा या माऊलीचे गावे तेवढे गुणगान थोडे आहे. नुकताच त्यांच्या संजीवन समाधीचा ७००वा सोहळा थाटामाटाने महाराष्ट्रभर साजरा झालेला आहे. त्या पार्श्वभूमीवर पुनःश्च एकदा ज्ञानदेवांचे पुण्यस्मरण !

— ❖ ❖ ❖ —



द्वापारातील आपले अवतार कार्य संपवून श्रीकृष्ण कलियुगाच्या प्रारंभीच वैकुंठी म्हणजे आपल्या स्वस्थानी परत गेले. सुरवरांना आपार आनंद झाला. नित्यनियमानं वैकुंठीच्या प्रासादात भगवान महाविष्णूंची पूजा अर्चा सरु झाली. सर्वत्र आनंद सरी मुक्त वाहू लागल्या. समिराच स्वैर सुगंधी वाहण पुन्हा सुरू झालं. आनंदवल्लरू उमलून आल्या. महाविष्णू अतिदिव्य अशा कनकासनावर रत्नजडीत अलंकार घालून बसले होते. स्मित वदनाने हा सुख सोहळा निरखित होते सर्वत्र महाविष्णूचे गुणगान रंगून गेल होतं. इतक्यात महाविष्णूच्या कानी शब्द येऊन आदळले.

त्राहिमाम्, त्राहिमाम्....

एक आक्रोश, एक आक्रंदन सारं आनंदमय वातावरण दुषित करून गेलं. सारे स्तब्ध झाले. महाविष्णूनी आवाजाच्या अनुरोधानं पाहिलं. अतृप्त आत्मे मोक्षासाठी वैकुंठीच्या द्वारी दाटीवाटीने उभे होते.

आक्रंदणारे आत्मे आळंदी क्षेत्रातले होते. धर्मपीठ म्हणून समजल्या जाणाऱ्या आळंदीत धर्माच्या नावावर, स्वार्थासाठी वेदार्थ लावून माणूस धर्माची, मानवतेची, दया, क्षमा, शांतीची कशी गळचेपी चालली आहे आणि त्यामुळे सामान्य जनांना जीवन जगणे कसे दुष्कर झाले आहे याची कैफीयत घेऊन हे आत्मे आले होते.

महाविष्णूंनी शांतपणे सारं ऐकून घेतलं आणि तीव्र वेदनेने त्यांचं अंत:करण भरून आले. नकळत वेदना अश्रुरुप घेऊन गालावरून घरंगळत खाली उतरली. आणि इंद्रायणीचं रुप घेऊन आळंदीच्या काठाने दुःखीतांचे अश्रू आपल्या अश्रूत सामावून घेऊन संथ वाहू लागली.

या इंद्रायणीच्या काठावर एक तेजपुंज बालयोगी ॐकाराचा जप करीत ध्यानस्थ बसलाय. वैराग्याच आगळं तेजोवलय त्याच्या मुखाभोवती पसरलेलं आहे तिर्थयात्रेला म्हणून घरातून बाहेर पडलेला हा तिर्थंकर इंद्रायणीच्या या पवित्र परिसरात स्वानंदात

रममाण झालाय.

आपेगावच्या गोविंदपंत कुलकर्णी यांचा हा एकुलता एक मुलगा. विठ्ठलपंत. घरदार सोडून स्वानंदाच्या शोधात भ्रमंती करीत निघालेला. आळंदी येऊन तो स्थिरावला होता. योगायोगाने आळंदीचे कुलकर्णी सिद्धोपंत यांच्या दृष्टीस हा बालयोगी पडला. त्यांनी त्याला अतिआदराने आपल्या घरी नेले.

भगवंत संकेताचा पहिला धागा तरी अशा प्रकारे छान जुळून आला. सिद्धोपंत यांना रुक्मीणी नावाची एकुलती एक कन्या होती. ती ह्याला दे असा भगवंताचा आदेश झाला. विठ्ठलालाही तसाच आदेश भगवंताने दिला आणि संन्यासी होणारा विठ्ठलपंत संसारी झाला.

दारात उमलतं यौवन उभं होतं. मायेची अभिलाषा संसाराची आसक्ती वाढली होती तर दुसरं मन भगवंताकडे खेचित होतं. अखेर दुसर मन प्रबळ झालं आणि संसारी विठ्ठलपंत संसार सोडून संन्यास घ्यायला सिद्ध झाला. संन्यास घ्यायला परवानगी मिळावी म्हणून रोजरात्री आपल्या पत्नीची मनधरणी करू लागला. वारंवार म्हणू लागला.

**वचनमुक्त तू करूनी प्रिये ग देई अनुज्ञा मला**
**प्रिये तू देई अनुज्ञा मला...॥धृ०॥**

**कोष रेशमी संसाराचा**
**कोमल विळखा तव बाहूंचा**
**बंध तोंडून हा मायेचा-मुक्त करी ग मला...॥१॥**

**ओढ घेतसे मन आकाशी**
**जातो, फिरतो पण दाराशी**
**तुझ्या अनुज्ञेसाठी उर्वशी-मार्ग असे अडला...॥२॥**

**क्रमीली वर्षे सात तरीपण**
**पुत्र नाही ग पोटी अजून**
**संन्यासाचा मार्ग आचरून-भेटीन मी विठ्ठला...॥३॥**

**विठ्ठल विठ्ठल ध्यास लागला**
**संसारी नच शांती जीवाला**
**शांतीविन या आत्मसुखाला अर्थ नसे उरला ॥४॥**

यौवनाच्या तबकात पातिव्रत्याचं निरंजन लावून पतिदेवाना मनोमनी आळवणाऱ्या, मनी पुत्रप्रेमाची, प्राप्तीची, अभिलाषा धरून आपल्या पतिदेवांकडे ईप्सित साध्य होण्याच्या दृष्टीने पाहणाऱ्या, महासाध्वी रुक्मीणीच्या दारी विरहाची वेदना देणारी रात्र रोज येत होती आणि अश्रूरुप गंगा होऊन रोज निघून जात होती.

बिचारी इंद्रायणी, भगवंताची अश्रूरुप गंगा होऊन रोज निघून जात होती. संथ प्रवास करीत होती आणि रुक्मीणीची व्यथा बनून तिच्या नयनात रोज नव्यानं जन्मही घेत होती. मूक अक्रोश, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी रोज आक्रंदत होता आणि विठ्ठलपंतालाच मूकपणे सवाल करीत होता....

**या नयानातून नित्य वाहते-इंद्रायणीची व्यथा**
**वैष्णवा कसली अनुज्ञा घेता? ॥धृ०॥**

**अग्नीसाक्ष ही सात पाऊले**
**सात स्वर्ग मी तुडवित आले**
**नाथ कसे हे विसरुन गेले -**
**सात जन्मीची कथा ? ॥१॥**

**वचन दिले हो तुम्हीच मजला**
**'नातीचरामी' कसे विसरला**
**कसे सांगू मी आता कुणाला -**
**या हृदयीची व्यथा ? ॥२॥**

**संसारी मी तुमची कांता**
**पातिव्रत्या येईल बाधा**
**तुम्हांस सारे माहित असता -**
**सोडून कां हो जाता ? ॥३॥**

**गात्र गात्र ही आली उमलून**
**भावभावना घ्या हो समजून**
**श्रीमंताच्या घरात राहून -**
**कृपण कां हो होता ? ॥४॥**

**काय कमी हो या संसारी**
**उदास कां हो असे अंतरी**
**भावफुलांच्या स्वप्नमंदिरी -**
**उभी असे कांता ॥५॥**

**बालकृष्ण तो देवघरातील**
**दुडूदुडू रांगत यावा शामल**
**स्वप्न मनातील कां हे निष्फल -**
**पतीदेवाकरता ? ॥६॥**

परंतु या अश्रुरुप गंगेचा विठ्ठलपंताच्या मनावर काहीही परिणाम झाला नाही. प्रवृत्ती निवृत्तीच्या रस्सीखेचीत अखेर निवृत्तीचाच विजय झाला आणि एक दिवस काहीही न बोलता काहीही यत्किंचित जाणीव न देता विठ्ठलपंतानी थेट काशीचा रस्ता धरला. त्यांना आता संन्यास घ्यायचा होता. काशीला त्यावेळी रामानंदस्वामी नावाचे महान तपस्वी वास्तव्य करुन राहीले होते. त्यांचा अनुग्रह आपल्याला मिळावा हीच त्यांची इच्छा होती.

गंगेकाठी ब्रह्मकर्म करावं, उदरनिर्वाहासाठी चार घरी माधुकरी मागावी आणि उरलेला वेळ ईशचिंतनात घालवावा असा त्यांचा दिनक्रम सुरु झाला. अखेर ह्या निग्रही साधनेला

समाधान लाभण्याची वेळ आली. रामानंदस्वामीची आणि त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. आणि रामानंदानी विठ्ठलपंताना संन्यास दिक्षा दिली. संसारी विठ्ठलपंत आता खऱ्या अर्थाने संन्यासी झाले. 'चैतन्यस्वामी' बनले.

इकडे मात्र सकल संपन्न सौभाग्यवती रुक्मीणी आपल्या दैवाला दोष देत घरातून निघून गेलेल्या विठ्ठलपंताची आतुरतेने वाट पहात होती. व्रतवैकल्यात आपल्या जीवनाचा क्षणन्‌क्षण गुंतवून टाकीत होती. मनोमनी भगवंताला आळवित होती. तिने इंद्रायणीच्या काठी उभ्या असलेल्या सुवर्ण अश्वथाला लक्ष प्रदक्षिणा घालण्याचा नेम आचरला; आणि अचानक भाग्याचा फासा दैवावर उलटून पडला. काशीक्षेत्री वास्तव्य करुन राहीलेले रामानंदस्वामी तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशाने बाहेर पडले. आणि फिरतफिरत आळंदीक्षेत्री आले. आळंदीच्या प्रसिद्ध सिद्धेश्वर मंदिरात त्यांचा मुक्काम होता.

सुवर्ण अश्वथाला प्रदक्षिणा घालण्याचा आपला दिनक्रम आटोपून रुक्मीणी सिद्धेश्वर मंदीरात सिद्धेश्वराचे दर्शन घेण्यासाठी आली. आणि अभावितपणे तिचं लक्ष ह्या तेज:पुंज यतिराजावर पडलं. विनम्र होऊन रुक्मीणी वाकली आणि तिने अत्यंत नम्रतापूर्वक सद्‌भावयुक्त अंत:करणाने यतीरायाला नमस्कार केला. हातातल्या काकणांचा किलकिलाट झाला आणि ध्यानस्थ असलेल्या यतीदेवांच्या मुखातून धीरगंभीरपणे शब्द उमटले.

''पुत्रवती भव.''

रुक्मीणीने महत्‌प्रयासाने इतकावेळ दाबून ठेवलेलं दु:ख अश्रूरुप घेऊन बाहेर पडलं, आणि अत्यंत निराश, विमनस्क स्थितीत ती यतीदेवाना म्हणाली.

**अभागिनीच्या घरी कधी कां –**
**देव येई पाहुणा**
**परत घ्या आपुला नजराणा –**
**यतिवरा आपुला नजराणा ॥धृ०॥**

**अभागिनी मी शतजन्मांची**
**वाट पाहते पती चरणांची**
**सुवासिनी मी सदा साहते –**
**जीवनी ही यातना ॥१॥**

**''पुत्रवती भव'' वदला तुम्ही**
**नाही पती हो परंतु सदनी**
**पुत्रहीन मी अपूर्ण जीवनी –**
**हीच उरी वेदना ॥२॥**

**पाषाणावर ओतून पाणी**
**येईल कां हो अंकूर फुटूनी**
**म्हणून आपुली वरद ही वाणी –**
**शाप गमे देखणा ॥३॥**

रुक्मीणीच्या तोंडून बाहेर पडलेल्या दु:खावेगाच्या पंक्ती ऐकून रामानंदस्वामी विचारमग्न बनले. त्यांनी अधिक हळूवारपणे तिची चौकशी केली. आणि त्यांना कळून चुकले की आपणाकडून संन्यासदिक्षा घेऊन आपला पट्टशिष्य बनून आपल्या आश्रमात काशीक्षेत्री राहात असलेला चैतन्यस्वामी म्हणजेच विठ्ठलपंत हा ह्या रुक्मीणीचा पती आहे.

रामानंदस्वामींनी तिची समजूत घातली आणि माझा आशिर्वाद कधीही विफल होणार नाही. तुझा पती लौकरच तुला येऊन भेटेल असे आश्वासन देऊन स्वामी निघून गेले. त्यांनी पुढची तीर्थयात्रा अपूर्णच ठेवली आणि ते काशीक्षेत्र परत फिरले.

आश्रमात आल्याबरोबर त्यांनी विठ्ठलपंतांना बोलावून घेतलं आणि त्यांची चांगलीच कानउघडणी केली. विठ्ठलपंतांनी स्वामींची परोपरीने विनवणी केली. त्यांची क्षमा मागितली, परंतु स्वामी ऐकायला तयार होईनात. त्यांनी, ''तूं ताबडतोब घरी परत जा आणि सुखाने संसार कर'' अशी माझी तुलाआज्ञा आहे असे त्यांना फर्माविले.

नाईलाज झालेले विठ्ठलपंत परत फिरले आणि एक दिवस अचानकपणे आळंदीत दाखल झाले.

रुक्मीणी तुळशीपुढे रांगोळी काढीत अंगणात बसली होती. पतीव्रतेने केवळ अंगणात पडलेल्या सावलीवरुनच आपल्या पतीला ओळखलं होतं. आणि हर्षभराने ही आनंदाची बातमी सांगण्यासाठी ती आत पळाली होती. सिद्धेश्वर मंदीरात यतीदेवांनी आशिर्वाद दिल्याप्रमाणे सारं घडून आलं होतं. तिचं मन आनंदात हींदोळत गावू लागलं.

**उगवला दिन भाग्याचा असा**
**उजळला सोन्याचा कवडसा**
**मंदिरी, सोन्याचा कवडसा ॥धृ०॥**

**देव मंदीरी आला परतून**
**भाग्यलक्ष्मी गेली हरकून**
**दैवावरती आज उमटला –**
**भाग्याचा ग ठसा.... ॥१॥**

**थांबा तेथे असे जरासे**
**पंचारती मी घेऊन येते**
**हासत हासत पुन्हां घेऊं दे –**
**सौभाग्याचा वसा.... ॥२॥**

**व्रत वैकल्ये झाली सुफलीत**

**अश्वथा बघ आले दैवत**
**येई वसंता तूंही धावत -**
**छेडीत राग मधुरसा.... ॥३॥**

**बघ इंद्रायणी येऊन दारी**
**कैलासाहून आली स्वारी**
**तव कांठावर अक्षय राहील -**
**आळंदीचा ठसा.... ॥४॥**

विठ्ठलपंत घरी परतून आल्याने घरात आनंदी वातावरण पसरलं होतं. आळंदीत विठ्ठलपंत सासरीच म्हणजे सिद्धोपंतांकडेच राहीलेले होते. रुक्मीणीच्या चेहऱ्यावर तर आनंद उतू चालला होता. आणि एकुलत्या एक कन्येच्या मुखावरचे हे आनंदी भाव पाहून सिद्धोपंत आणि त्यांची पत्नी म्हणजे रुक्मीणीचे आईवडील हरखून गेले होते. पण हे सुख नियतीला फार काळ रुचलं नाही. विठ्ठलपंत हे संन्यास घेऊन परत संसारात परतले होते. हे कृत्य धर्मरुढीविरुद्ध आहे अशी ओरड करुन आळंदीच्या धर्ममार्तण्डांनी सिद्धोपंत आणि विठ्ठलपंत यांना वाळीत टाकले.

आळंदीत परत फिरण्यापूर्वी विठ्ठलपंतांना याची जाणीव निश्चितपणे झालेली होती. एकदा संन्यास घेतल्यानंतर परत संसारात येणं म्हणजे धर्माज्ञेचं उल्लंघन करणे आहे व हे धर्ममार्तण्डांना मान्य होणार नाही हे ते जाणून होते. परंतु जर गुरु आज्ञा पाळली नाही तर महत्पातकाचे आपण धनी होऊ हेही त्यांना कळत होतं. म्हणून गुरुआज्ञेचेच आपण पालन करायचं हे ठरवून विठ्ठलपंत परत फिरले होते. पण आपल्यामुळे आपल्या सासऱ्यावर आलेला दुर्धर प्रसंग पाहून त्याचे अंत:करण द्रवले आणि त्यांनी घराबाहेर पडायचा निश्चय केला.

आपल्या पत्नीला रुक्मीणीला घेऊन एका वस्त्रानिशी ते बाहेर पडले आणि सिद्धबेटावर एक झोपडी बांधून राहू लागले. रुक्मीणी तिथेही सुखी होती. कारण आता तिची कूस उजवली होती. तिच्या पोटी निवृत्ती जन्माला आला होता. निवृत्ती दोन वर्षांचा झाला आणि रुक्मीणीला पुन्हा दिवस गेले. रुक्मीणीला डोहाळे पडूं लागले. मात्र यावेळचे तीचे डोहाळे काही वेगळेच होते. कारण आता स्वयं भगवान विष्णूंनी तिच्या उदरी प्रवेश केला होता. तिची ही अवस्था पाहून आणि मुखावरचे अतुलनीय तेज पाहून तिला कसले डोहाळे लागलेत हे जाणून घेण्यासाठी तिला विठ्ठलपंतांनी विचारलेही. त्यावर उत्तर देताना रुक्मीणी म्हणाली.

**रुप ते सावळे येथ जन्मा यावे**
**चैतन्याचे तेज बाळ माझे व्हावे.... ॥धृ०॥**

**कौसलेस लाभे सावळा श्रीराम**
**यशोदेचा कान्हा निळा घनशाम**
**आकाशीच रुप, तेच मूर्त व्हावे.... ॥१॥**

**ज्ञानरुप गंगा मुक्त येथे व्हावी**
**दया क्षमा शांती स्तोत्र नित्य गावी**
**ज्ञानीयांचे ज्ञान अज्ञानास यावे.... ॥२॥**

**क्षमाशील व्हावी येथ धर्मनीति**
**त्राही त्राही झाले सर्व प्राणी चित्ती**
**चित्तीचे हे क्षोभ आनंदात न्हावे.... ॥३॥**

**नको धर्मगाथा नको शास्त्रनीति**
**क्षणमात्रे त्याने निवारावी भ्रांती**
**असे ज्ञानरुप माझे बाळ व्हावे.... ॥४॥**

रुक्मीणीला असे डोहाळे पडणे साहजिकच होते. कारण स्वयं दयाघन तिच्या पोटी आकार घेत होता. द्वापारातलं आपलं अपूर्ण राहीलेलं कार्य पूर्ण करण्यासाठी जगाचा नियंता पुन्हा मनुष्यरुप धारण करु इच्छीत होता. त्यासाठी त्यांनी आपल्या आठव्या अवतारातील जन्मकालच ह्या नव्या अवतारासाठी निश्चित केला होता.

श्रावणाचा महिना, पावसाची एका लयीत मंद मंद तालबद्ध रिमझीम बरसात सुरु आहे. वद्य अष्टमीचा दिवस त्यामुळे सभोवार काळोखाचं साम्राज्य. मध्येच विद्युल्लता चपलखपणे चमकून जात होती.

सिद्धेश्वर मंदीरात श्रीकृष्ण जन्माख्यान किर्तनकार रंगवून सांगत होते. आणि इकडे रुक्मीणी अंथरुणावर प्रसूती वेदनांनी तळमळत होती. प्रहररात्र उलटली होती आणि सिद्धेश्वर किर्तनकारांचं किर्तन कृष्णजन्माच्या क्षणापर्यंत येऊन पोहचले होते. पौरजनानी हरीनामाच्या जागरात ह्या आठव्या अवताराचं मंदीरात स्वागत केले. याच, अगदी याचक्षणी अचूक वेळ साधून रुक्मीणीच्या पोटीही पुत्ररत्न प्राप्त झालं.

विठ्ठलपंतांना अत्यानंद झाला. ते वेगळ्याच भावविश्वात रममाण झाले. वीणेवर आपोआप सुरेल ॐकार शब्द प्रसवू लागला. चराचरात ॐकाराचा अनाहत नाद घुमू लागला.

दुष्टांची दुष्टता नष्ट करण्यासाठी सज्जनांच्या संरक्षणासाठी अज्ञानाचा अंधकार नाहीसा करण्यासाठी, सद्धर्माच्या संस्थापनेसाठी अवनीवर परमेश्वरानं रुक्मीणीच्या पोटी नवा अवतार धारण केला होता. विठ्ठलपंतांच्या संभ्रमित मनावरचं पटल आपोआप दूर झाले; आणि त्याच क्षणी या द्वितीय पूत्राचं नाव ठरवलं. ज्ञान. (ज्ञानदेव)

अवकाशातील ग्रहांचं गणित मांडून विंठलपंतांनी स्वत:च पत्रिका तयार केली.

''परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय् संभवामी युगे युगे''

**अमृताची धार लेई सोनकळा**
**कृष्ण अष्टमीला ज्ञानदेव झाला.... ॥धृ०॥**

**पावसाची धार झरे संथ संथ**
**वैकुंठीचा राणा प्राशीतो अमृत**
**यशोदेचा कान्हा आळंदीस आला.... ॥१॥**

**दर्भाची ती शेज नक्षत्रांची जाळी**
**झुले झोपडीत ज्ञानेशाची झोळी**
**समीरा सुगंध कस्तुरीचा आला.... ॥२॥**

**चंद्र सूर्य भाळी लक्ष दीप ज्योती**
**त्याहूनी सुंदर ज्ञानेशाची कांती**
**दारी वेदनेच्या - सूर्य हा उदेला.... ॥३॥**

**लक्ष चांदण्यांची पांघरुनी शाल**
**किरणांशी खेळे वैकुंठीचे बाळ**
**धरणीच्या गर्भी मोगरा फुलला.... ॥४॥**

हळूहळू ज्ञानाचा हा सूर्य उदयाचल पादाक्रांत करीत निघाला. आपल्या ज्ञानरश्मीनी दु:खीतांना सुखावू लागला. ज्ञानदेव रांगता रांगता आता धावू पळू लागला. मोठ्या भावाच्या पावलावर पाऊल ठेवीत पुढे चालू लागला. निरनिराळी ज्ञानाची क्षेत्रे पादाक्रांत करीत हा हा म्हणता पुढे निघाला.

ज्ञानदेवाच्या पाठीवर विठ्ठलपंत रुक्मीणीला सोपान आणि मुक्ताई अशी आणखी दोन अपत्ये झाली. तिही बघता बघता मोठी झाली. आळंदीचं वातावरण आधीच गढूळ झालेलं. काळ जसजसा पुढे सरकत निघाला तसतशी कटूता अधिकच वाढू लागली. ह्या कटूतेचे भयानक चटके निदान या लहानग्यांना बसू नयेत म्हणून विठ्ठलपंतांनी आता आळंदी सोडायचा मनाशी निश्चय केला. निश्चय पक्का झाला. आता आळंदी सोडायची आणि मुलांना घेऊन त्र्यंबकेश्वरी जाऊन राहायचं. तिथे त्र्यंबकेश्वराची नित्य सेवा करावी आणि परमार्थमय मोक्ष साधावा ही त्यांची इच्छा होती.

विठ्ठलपंतांनी आपला निर्णय अमलात आणला ते आळंदी सोडून त्र्यंबकेश्वरी आले.

मध्यरात्रीच्या पहिल्या प्रहरी उठावं, कुशावर्तावर जाऊन स्नान करावं आणि विठ्ठलपंत, निवृत्ती, ज्ञानदेव आणि सोपान यांनी मिळून ब्रह्मगिरीची सव्य प्रदशिक्षा करावी असा नित्यक्रम सुरु झाला. ह्या कठोर व्रताचर्णामध्ये एक वर्ष उलटलं आणि एक दिवस अशीच प्रदक्षिणा करीत असता त्यांच्यावर एका वाघाने अचानक हल्ला चढवला. जीवाच्या आकांताने ज्ञानेश्वर आणि सोपानाला घेऊन विठ्ठलपंत पळाले. पण निवृत्तीचा मार्ग चुकला. तो भलतीकडेच गेला. वाघाच्या भितीने पळालेला निवृत्ती फिरत फिरत एका गुहेजवळ आला आणि गुहेत शिरला. ही गुहा गहिनीनाथांची होती. इथे गुरु गहीनीनाथ गेले दोनशे वर्षे तपश्चर्या करीत होते. आपल्या सत्‌शिष्याची आतुरतेने वाट पहात बसले होते.

तो क्षण आज आला होता. गुरुशिष्यांची नजरानजर झाली आणि अंतराची अंतराला ओळख पटली. गहिनीनाथांनी निवृत्तीला अनुग्रह दिला. नाथपंथाची दिक्षा दिली. आणि पंथाचा पुढे विकास करण्याबाबत आदेश देऊन गहिनीनाथ अंतर्धान पावले.

वाघाच्या हल्ल्यानंतर निवृत्तीस वाघाने मारले असावे अशा संभ्रमात विठ्ठलपंत आणि सर्व कुटुंब दु:खसागरात बुडून गेले होते ....आणि अचानक एक दिवस त्यांच्या कानी शब्द पडले.

**कलीयुगी या तारक मनुजा - नाथांची छाया**
**आलख निरंजन - आलख आया.... ॥धृ०॥**

**जाणूनी सारे भविष्य इथले**
**तुम्ही आम्ही हे जन्म घेतले**
**त्या कार्याचे पाऊल पहिले -**
**दासी केली माया.... ॥१॥**
**आलख निरंजन आलख आया**

**शिवशंभूते कैलासपूरीचे**
**मूळपुरुष ते या पंथाचे**
**चरणी वाहीली त्या नाथांचे -**
**ही दुबळी काया.... ॥२॥**
**आलख निरंजन आलख आया**

**गहिनीनाथ ते सद्‌गुरु माझे**
**एकच दैवत मर्त्य जीवाचे**
**हृदयी धरुनी स्वरुप गुरुंचे -**
**नित्य वंदीलो पाया.... ॥३॥**
**आलख निरंजन आलख आया**

**आम्ही न दुबळे या भूमीवर**
**नित्य वंदीती नाथा सूरवर**
**सदैव फिरते तिन्ही लोकांवर -**
**नाथांची काया.... ॥४॥**
**आलख निरंजन आलख आया**

अचानकपणे घरी सुखरुप परत आलेल्या निवृत्तीला पाहून सर्वांनाच अत्यानंद झाला. विठ्ठलपंताचे डोळे तर आनंदाश्रूनी भरून आले. ही सारी त्या दयाघन शिवशंभूची कृपा. त्यानेच

माझ्या निवृत्तीचे रक्षण केले अशी त्यांची मनोमन खात्री पटली. आणि हाती फुलांची परडी आणि पंचारती घेऊन ते त्र्यंबकेश्वराच्या मंदीराकडे धावले आणि आरती ओवाळीत मुक्त कंठाने शिव स्तुती करू लागले.

**जय जय जय जय हे गौरीहर**
**कैलासपते जय, जय शिवशंकर**
**जय जय जय जय हे गौरीहर ॥धृ०॥**

**आम्ही अभागी या भूमीवर**
**दीन दुबळे हे तुझेच लेकूर**
**रक्षी रक्षी हे करुणाकर ॥१॥**

**अगाध करणी तुझी शंकरा**
**पूत्र रक्षिला अभयाकार**
**त्रिपूरमर्दना हे ॐकारा**
**कैलासीचा तू योगेश्वर ॥२॥**

**असाच ठेवी सदा अभयकार**
**क्षमा शांती आण या भूवर**
**सोड समाधी हे करुणाकर**
**जागा हो लवकर ॥३॥**

निवृत्तीला गहीनीनाथांचा अनुग्रह प्राप्त होताच तो आता **'निवृत्तीनाथ'** झाला होता. महत् कार्यातली एक पायरी तर पादाक्रांत झाली होती. आता धर्माची ग्लानी नष्ट करण्यासाठी नाथ संप्रदायाची वाढ करण्यासाठी त्याला दुसरी पायरी गाठायची होती. ती म्हणजे ज्ञानेश्वरांना अनुग्रह. बारा वर्षाचे निवृत्तीनाथ दहा वर्षाच्या ज्ञानदेवाना अनुग्रह देण्यासाठी निघाले होते.

एका प्रातःकाळी दोघेही उठले. मायपित्यांना वंदन करून एकांत स्थानी निघाले. ब्रह्मगिरीच्या एकांत वनात गौतम ऋषीच्यासाठी गोदावरीच पवित्र उदक ज्या औदुंबर वृक्षामधून बाहेर पडत त्या स्थानी आले. त्या पवित्रस्थानी स्नान करून निवृत्तीनाथाना साष्टांग प्रणीपात करून ज्ञानदेव पद्मासन घालून बसले. निवृत्तीनाथानी जवळच धुनी पेटवली आणि ते ज्ञानेश्वरांना उपदेश करू लागले.

**''तत्वमसि''**
**ते आत्मरुप ''तू'' आहेस.**
**''अहं ब्रह्मास्मि''**
**''मी'' ब्रह्म आहे**
**''आयामात्मा ब्रह्म''**
**हा आत्मा ब्रह्म रुप आहे.**
**''प्रज्ञानं ब्रह्म''**
**हे सर्व ज्ञानरुप आहे.**

ज्ञानदेवाना असा गुरुपदेश करून निवृत्तीनाथानी त्यांना पृच्छा केली. ज्ञानदेवा, योगसामर्थ्याने तुझ्याठायी आता पूर्णत्व आले आहे. मिटल्या नेत्री तू जे ॐकार रुप पहात आहेस त्यामध्ये तुला काय दिसते?

गुरुदेव, ब्रह्मरुप आकाशात एक सुंदर कमळ आहे. या कमळात एक काळसर रंगाचा एक तेजस्वी बिंदू आहे आणि सहस्त्र दलाच्या आत असलेल्या या बिंदुवर माझच आत्मरुप मला दिसते आहे. हे आगळ दृष्य पाहता पाहता अचानक ज्ञानदेवांच्या रसनेवर प्रतिभेने अमृत वर्षाव केला. त्यांची प्रतिभा अभंगरुप होऊन सद्गुरु निवृत्तीनाथांच्या कानावर बरसू लागली.

**ज्ञानदेव म्हणे ब्रह्मरुप सृष्टी**
**ॐकार स्वरुपी स्थिरावली दृष्टी ॥धृ०॥**

**मी तू कोण आता नुरे भेदभाव**
**ब्रह्मरुप सारे चराचरी जीव**
**गुरुकृपा देई प्रतिभेस पुष्टि ॥१॥**

**ब्रह्मरंध्री आहे सुवर्ण कमळ**
**शोभे भोवताली चहुरंगी दल**
**स्थिरावला तेथे आहे जगजेठी ॥२॥**

**काय वर्णू आता सांगा गुरुराया**
**चरणांचा दास दुबळी ही काया**
**मुक्तीचा सोपान आज आला हाती ॥३॥**

निवृत्तीवर गहीनाथांचा अनुग्रह झाला होता. ज्ञानदेवही योगविद्येत आता समर्थ झाला. त्याच्या सद्भावनेला प्रतिभेचे पंख फुटले. त्र्यंबकेश्वराची यात्रा सफल झाली. आता विठ्ठलपंताना पुन्हा आळंदीची ओढ लागली. विठ्ठलपंत पत्नी मुलांसह वर्तमान आळंदीत आले. उरात आता एकच शल्य होते. आळंदीच्या ब्रह्मवृंदानी आपल्याला पावन करून घ्याव. विठ्ठलपंत तसा प्रयत्न पुन्हा करू लागले. परंतु पाषाण हृदयी आळंदीकरांची हृदय आता वज्राहूनही कठोर झाली होती.

ज्ञानाचा खोटा बुरखा पांघरून आणि ग्रंथाचा बडीवार डोक्यावर नाचवून असंमजस आळंदीकर अधिकच असंमजस बनत चालले होते. गादी लोडाला टेकून आणि समाजातल्या अन्य वर्गाकडून सेवा करून घेत बसलेल्या ह्या धर्ममार्तंड म्हणवणाऱ्या मूठभर लोकांनी धर्माचे मूळ रुपच बदलून टाकलं होतं.

विठ्ठलपंताचे सारे प्रयत्न विफल झाले. आता जगण्यात काही अर्थ नाही हे त्यांनी मनाशी ठरवून टाकलं. निवृत्ती, ज्ञानदेव आता मोठे झाले होते. त्यांच्यावर सारी जबाबदारी टाकून प्रयागतीर्थी या देहाच विसर्जन कराव आणिं मोक्षाच्या

दारी धरण धरून बसावं अस त्यांनी ठरवलं. रुक्मिणीला आपला बेत सांगितला आणि सारे मोहपाश सोडून एका निरवरात्री दोघेही निघून गेले.

सकाळी उठल्यावर आई आणि तात् आपल्याला कायमचे असे सोडून निघून गेलेत याची जाणीव होताच चिमुकल्या मुक्ताई आणि सोपानाने आकांत मांडला. निवृत्तीनाथ तर मूकच बनले. आता मोठेपण अंगावर घ्यायची जबाबदारी ज्ञानेश्वरांवर येऊन पडली होती. त्यांनी आपल्या डोळ्यातील अश्रूंना बांध घातला आणि जाणतेपणाने ते मुक्ताई आणि सोपानाला सांगू लागले.

**माय तात सोडून गेले उरी वज्रघात**
**धरणीची उब आता आकाशाचा हात**
**शिरी आकाशाचा हात ॥धृ०॥**

**'आकाशाचे लेणे' आम्ही–तोच माय तात**
**माय सोडूनिया गेली–भूमि हीच माता**
**हिच्यासाठी उरला आता–जिवनी आकांत ॥१॥**

**दया क्षमा नाही ऐसा, काय असे धर्म**
**कुणालाच नाही ठावे उचित काय कर्म**
**शिरीग्रंथ झेलून झाला कोण ज्ञानवंत? ॥२॥**

**कशासाठी रडसी मुक्ता–उचित तेच झाले**
**चला उठा सोपाना ते पुसा आता डोळे**
**चिरंजीव नाहीं कोणी–हे सर्व नाशीवंत ॥३॥**

वडिलांच्या गमनानंतर त्यांची ''अन्नपूर्णा'' झोळी ज्ञानदेवांनी आपल्या खांद्यावर अडकवली आणि ''ॐ भवंति भिक्षा देहि''चा पुकारा सुरु केला. पण ज्ञानेश्वरांना प्रत्येक घरी एकापेक्षा एक कटू अनुभव येऊ लागेल. इथे हलाहलापेक्षाही जहरी विषारी अंतःकरणाचे लोक वावरतायत हे पाहून ज्ञानेश्वरांच पुष्पापेक्षाही कोमल असणारं अंतःकरण द्रवलं. ते विमनस्क बनले. ज्ञानीयांचा राजाही या क्षणीक भ्रमाने भ्रमून गेला. त्याच कशातही लक्ष लागेनास झालं.

अपमानाचं शल्य अंतरात खोल खोल रुतत गेलं. ''संन्याश्याच्या संततीनं आधी जन्माला येऊच नये आणि आलीच तर लगेच मरून जावं'' महादेव शास्त्र्यांच्या ह्या उद्‌गारांनी ज्ञानेश्वरांचं अंतःकरण शतशः विदीर्ण झाल होतं. वावटळीत सापडलेल्या जीर्ण पर्णाप्रमाणे दिशाहीन होऊन ज्ञानदेव चालत राहीले आणि इंद्रायणीकाठच्या सुवर्णअश्वथा खाली येऊन विचारमग्न स्थितीत बसून राहिले.

त्यांच्या मनात एकच प्रश्न होता, असं का? का? का?

ज्ञानेश्वरांची बराच वेळ वाट पाहून त्यांना शोधीत शोधीत निवृत्तीनाथ तेथे आले. त्यांना पाहताच ज्ञानदेवांच्या नेत्रातून अश्रूधारा ओघळू लागल्या. त्यांनी आपल्या गुरु माऊलीला सवाल केला.

गुरुमाऊली शांत सावली देणारा हा अश्वत्थ वृक्ष आणि वसंत ऋतुत बहरणारा आम्रवृक्ष एका भूमितून वर येतात ना? एकात भूमितून जीवन रस घेतात ना? मग आम्रवृक्षाची फळे मधुर का? आणि अश्वत्थ वृक्षाची फळे कटू का? सांगा गुरुदेव सांगा.

निवृत्तीनाथ म्हणाले, ज्ञानदेवा तू ज्ञानीयाचा राजा आहेस तूच असा संभ्रमित झालास तर इतरांनी काय करावे? त्यांनी कोणाच्या तोंडाकडे पहावं, अरे त्यांना खऱ्या ज्ञानाचा उजेड दाखविण्यासाठीतर तुझा हा जन्म आहे. सारी दीनदुबळी प्रजा तुझ्याकडे डोळे लावून बसली आहे. तुला तुझ्या प्रश्नाच उत्तर पाहिजे ना ! मग ऊठ आपण पंढरीला जाऊ या. तुझ्या ह्या प्रश्नाच उत्तर माझ्याजवळ नाही, त्या पांडुरंगाकडे आहे. तोच तुला ह्या प्रश्नाच उत्तर देईल.

दुसरा दिवशी उजाडला. निर्गुणाची ही चार सगुण रुपडी पंढरीला जायला निघाली. निवृत्तीनाथांनी पर्णकुटीचा दरवाजा ओढून घेतला. आता ते ज्ञानदेवांना घेऊन सगुण साकार भक्तीचा महादरवाजा उघडण्यासाठी पंढरीला निघाले होते.

सारे पंढरीला आले, आणि पंढरीचे पंढरीनाथाचे रुप पाहून ज्ञानदेव थक्क झाले त्यांच्या रसनेतून प्रतिभा प्रवाहीत झाली आणि ते निरतीशय आनंदाने गाऊ लागले.

**नव्हे पंढरी मानव नगरी**
**ही स्वर्गपूरी दुसरी**
**राहिले विठ्ठल या नगरी**
**राहिले विठ्ठल या नगरी ॥धृ०॥**

**अधिर होऊनी भक्तांसाठी**
**धावत आला इथे श्रीपती**
**धन्य पुंडलिक, त्याची भक्ती**
**केला उभा श्रीहरी ॥१॥**

**काळी काया कटी कर सुंदर**
**परीस पंढरी विठ्ठल भूवर**
**तन मन अर्पून ह्या चरणावर**
**नित्य स्मरा श्रीहरी ॥२॥**

**भाव गोजीरा हास्य मुखावर**
**निरखून पाही उदंड लेकूर**
**एकच मंदिर, एकच गोपूर**
**कळस किती अंबरी ॥३॥**

पंढरीत वैष्णवांची जत्राच भरली होती. पांडुरंगाच्या दारी चंद्रभागेच्या वाळवंटी उच्च निच भेदभाव विसरून वैष्णवांनी भक्तीचा प्रपंच मांडला होता. इथेच ज्ञानदेवांना नामदेवांची भेट झाली. ज्ञान आणि भक्ती यांचा सुरेख संगम झाला.

साहजिकच ज्ञानदेवांच मन पंढरी आणि आळंदी यांची तुलना करू लागलं. पंढरीत फुललेला भक्तीचा सहज भाव आणि आळंदीतला भेदाभेद यात फार मोठी दरी निर्माण झालेली आहे. हे ज्ञानदेवाना प्रकर्षानं जाणवलं आणि ही दरी भक्तीचा मळा फुलवून बुजवून टाकायच ज्ञानदेवांनी ठरवलं. मनातील ही मळमळ त्यांच्या रसनेद्वारे अभंगरुप घेऊन थयथय नाचू लागली. आळंदी आणि पंढरी एकाच वेळी त्यांच्या समोर साकार झाली.

**वैष्णवांचा छंद लागला जीवाला**
**पंढरीस शोभे विठ्ठल सावळा ॥धृ०॥**

**आठवावे रूप आठवे सगुण**
**जाहला विठ्ठल तोच तो निगुर्ण**
**धावुनिया येथे भक्तांसाठी आला ॥१॥**

**करुनिया ढाल धर्मग्रंथ सार**
**ब्रह्मज्ञानयांनी मांडला बाजार**
**आंधळ्यानी येथे धर्म बुडविला ॥२॥**

**आपला आपण सारुनिया दूर**
**पापी पुण्यवंता म्हणतो पामर**
**देवाहूनी थोर मनू इथे झाला ॥३॥**

**सोडूनिया बंध भवमुक्तीसाठी**
**शिकवितो भक्ती इथे जगजेठी**
**नामाचा महिमा पंढरी फुलला ॥४॥**

एकादशीला आलेली आळंदीतली ही चार भावंड नामदेवांच्याच घरी राहिली होती. आषाढीचा फराळ नामदेवा घरीच झाला. द्वादशी आणि चतुर्दशीला नामदेवांच्या बरोबर पंढरीचा सारा परिसर या भावंडानी निरखला आणि चतुर्दशीला जागर आणि पौर्णिमेला सकाळी काल्याच कीर्तन आटोपून सारे वारकरी आणि ही आळंदीकर मंडळी आळंदीस परत फिरली. मुखाने हरिनामाचा सतत गजर करीत गावोगावी हरिनामाची खिरापत पताका त्यांच्या खांद्यावर ठेवीत ज्ञानदेव पुढे निघाले. जो भेटेल त्याला प्रत्येकाला सांगत सुटले.

**रामकृष्णहरि जपा रे मुखाने**
**येईल धावोनी विठ्ठल त्वरेने ॥धृ०॥**

**नाम एक सोपे वेदाहूनी थोर**
**नुरे अंतरात वासनेचा चोर**
**मोगऱ्याचा वेल फुलेल सुखाने ॥१॥**

**मद, मोह, माया मत्सरादी दंभ**
**तटबंदी मोठी, मायेची ही अंग**
**होतील ती भंग, नाम साधनेने ॥२॥**

**वैकुंठीचे तेज उभे विटेवरी**
**भक्तांसाठी आले धावोनी पंढरी**
**धरा धरा पाय धावोनी त्वरेने ॥३॥**

पंढरीच्या ह्या वारीने निवृत्तीनाथांना संपूर्ण समाधान वाटलं. ज्ञानदेव संभ्रमात राहिला असता तर समाज जागृतीच कार्य त्यांच्या हातून घडविता आलं नसतं. निवृत्तीनाथांची ती चिंता आता पूर्णपणे मिटली होते. ते निश्चित झाले होते. पण आळंदीकर अजून बदलेल नव्हते. हजारो लोक ज्ञानदेवाकडून भागवताची हरिनामाची रोज संथा घेत होते तरी ह्या धर्म मार्तंडाच्या वृत्तीत मात्र यत्किंचितही बदल झाला नव्हता. ह्या चार भावंडाचे काहीसे पक्षपाती असे एकमेव मुद्गलशास्त्री तेवढे होते पण त्यानाही आळंदीकरांनी वाळीत टाकले होते. त्यांच्यावर हा अकारण झालेला अन्याय दूर करणे जरूरीचे होते. त्यासाठी या चार भावंडानी पैठणची वाट धरली.

पैठणकरांनी त्याची अग्नी परीक्षाच घेतली. परंतु ह्या अग्निपरीक्षेत सद्गुरु निवृत्तीनाथांच्या कृपाशिर्वादाने ज्ञानदेव पूर्ण उतरले. निसर्ग नियम बदलून त्यांनी रेड्याच्या मुखातून वेद वेदवून दाखविले आणि सर्वभूती एकच परब्रह्म भरले आहे हे आपले म्हणणे सिद्ध केले. आपल्या अलौकिक सिद्धींनी सारं पैठण जिंकून ज्ञानदेवांनी भागवताची पताका पक्की रोवली आणि ही सारी मंडळी विजय पताका बरोबर घेऊनच परत फिरली.

नियतीच्या मनात आता याहून फार मोठी कार्य ज्ञानेश्वरांच्या हातून घडवायच होतं. गोदावरी प्रवरेच्या पवित्र संगमावर सारे आले. संगमात स्नान करून एका विशाल वृक्षाखाली निवृत्तीनाथ बसले. ज्ञानदेव त्यांचे पाय चेपू लागले. मुखाने हरिनाम, हरिभजन सुरू होतं. ज्ञानदेव भावसमाधीत निमग्न झाले होते. इतक्यांत त्यांच्या चरणावर दोन अश्रूबिंदू ओघळले. ज्ञानदेव भानावर आले. त्यांनी त्या शरणागताची विचारपूस केली. त्याला दिलासा दिला आणि आपल्या जवळ बसवून घेतला. ह्या तरुणाच नाव होतं सदानंद. नेवाश्याच्या गावकुलकर्ण्याकडे तो कारकूनी करीत असे; पण संसार तापानी त्रस्त होऊन देह त्यागासाठी तो या संगमावर आला होता.

सदानंदाची ज्ञानेश्वर भेट आणि त्यांच्यातला संवाद दुरुन निवृत्तीनाथ ऐकत होतेच. गीतेच्या अवघड तत्त्वज्ञानावर प्राकृतात भाष्य करून संसारीकांना पूर्णानंद देणारा कुणीतरी